# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192462
UNIVERSAL LIBRARY

# नव्या गुजगोष्टी

[ शालेय स्वस्त आवृत्ति ]

प्रो. ना. सी. फडके

•

मूल्य बारा आणे

रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४

OUP—881—5-8-74—15,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M83·1 P26N    Accession No. PGM1926

Author [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below.

किंमत बारा आणे

प्रकाशक : **वि. र. बाम,** रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४
मुद्रक : **मनोहर पाटील,** जय गुजरात प्रेस, गांवदेवी, मुंबई ७

# पोरखेळ!

— १ —

मला लाज वाटली. मी अगदीं शरमून गेलों. माझा सारासार विचार मला म्हणाला, ‘ तुला हें शोभतं का ? ’ अन त्या प्रश्नाला मला उत्तर देतां येईना.

संध्याकाळची वेळ होती. ऑफिस सुटल्यावर रोजच्याप्रमाणें ट्रॅमनं जायच्या ऐवजीं पायीं चालत घरीं जायची आज मला लहर आली होती. बोरी-बंदरचा विस्तीर्ण चौक ओलांडून झाडीनं आच्छादलेल्या रस्त्यानं जाऊं लागलो तों डाव्या हाताला एस्प्लनेडच्या मैदानावर एके ठिकाणीं शाळेतलीं मुलं क्रिकेट खेळत होतीं तिकडे माझं लक्ष गेलं, आणि त्यांचा तो खेळ पहात रस्त्याच्या कडेच्या कठड्याला रेलून मी बराच वेळ उभा राहिलों. शाळेतून सुटलेल्या, स्वच्छंदानं नाचणाऱ्या बागडणाऱ्या त्या मुलांचा खेळ पहात माझं भान काही वेळ हरपलं, पण मी भानावर येतांच माझ्या विवेकानं मला चिमटा घेतला, आणि म्हटलं, ‘ हं तुला शोभत नाहीं ! ’ मनाची ती निर्भर्त्सना ऐकताच मला खरंच फार लाज वाटली. मी खरोखर शरमून गेलो.

मला शरमल्यासारखं व्हावं याला अनेक कारणं होतीं. एक तर शाळेंत जातांना मुलांनीं वाटेंत तमाशा पहात असं उभं राहूं नये तसंच ऑफिसातून सुटून घरीं जाणाऱ्या पुरुषानं वाटेंत वेळ घालवूं नये हें मला कळायला हवं होतं ! दुसरं असं, कीं ज्या कठड्याला रेलून मी उभा होतों त्या कठड्यावर आधींच कोणा तरी रसिकानं टाकलेल्या पानतंबाखूच्या रसाचा डाग माझ्या कोटावर उठला तरी तें माझ्या ध्यानांत आलं नव्हतं. आणि तिसरं असं, कीं जो क्रिकेटचा खेळ पहात मी इतका वेळ उभा राहिलों होतों त्याला ‘ क्रिकेट ’ म्हणणं धाडसाचं ठरलं असतं. तीं मुलं क्रिकेट कां खेळत होतीं ? छेः ! क्रिकेटचं निमित्त करून तीं मन मानेल त्याप्रमाणे बॅट फिरवीत होतीं, चेंडू फेकत होतीं, उड्या मारीत होतीं, धांवत पळत होतीं, आरोळ्या ठोकीत होतीं आणि एकमेकांशीं भांडत होतीं.

असला तो पोरखेळ पहात मी आपला अमूल्य वेळ खर्च केला हें खरंच फार चमत्कारिक झालं! माझ्या विवेकानं माझी कानउघाडणी केली ती उगीच नव्हे. मी कठड्यापासून दूर झालों आणि पुन्हां रस्त्याला लागून झपाझप पावलं टाकूं लागलों.

मात्र क्रिकेट खेळणाऱ्या त्या लहान लहान बालकांचा विचार माझ्या मनांतून जाईना. मनांत सारखं येऊं लागलं, त्या बालकांसारखा एक घटकाभर तरी आपल्याला पोरखेळ करायला मिळाला तर केवढी बहार होईल? कुठली तरी बॅट आणि कसला तरी चेंडू आणून आणि क्रिकेटचे बहुतेक नियम धाब्यावर बसवून तीं मुलं खेळत होतीं. पण, त्यापासून होणाऱ्या त्यांच्या आनंदाला सीमा होती काय? त्यांच्या खेळण्याच्या जागेपासून थोडयाच अंतरावर असलेल्या रस्त्यावरून कारकून, मास्तर, व्यापारी अशा लोकांची कोण रहदारी चालली होती! आणि या सगळ्या लोकांच्या अंतःकरणांत कमी अधिक प्रमाणांत चिंता, उद्विग्नता, निराशा यांची केवढी तरी गर्दी झाली होती! पण त्या गर्दीचं त्या मुलांना काय? तीं आपल्या पोरखेळांत आणि आनंदांत अगदीं मग्न होतीं. तो त्यांचा आनंद घटकाभर पहावासा मला वाटला तर बिघडलं कुठं?

माझ्या विवेकाशीं मी भांडूं लागलों.

मनाशीं चाललेल्या त्या भांडणाच्या भरांत मी किती चाललों तें मला कळलंसुद्धां नाहीं. फ्रेंच पुलपाशीं आलों आणि रेल्वेचं फाटक बंद असलेलं दिसलं तेव्हां मी माझ्या विचाराच्या तंद्रींतून जागा झालों आणि उभा राहिलों.

उभं राहणं भागच होतं. रेल्वेच्या बंद झालेल्या फाटकापुढं कुणाचं कांहीं चालत नाहीं. खांद्यावर कावड नेणारा गवळी, सायकलवाला, भारी किंमतीच्या मोटारींत गादीवर रेलून पडलेला लक्ष्मीपुत्र-सगळयांना बंद फाटकापुढं थबकावं लागतं. सगळया माणसांना समानतेनं वागायला लावणाऱ्या बंद फाटकासारख्या दुसऱ्या गोष्टी फार थोड्या असतील. आधुनिक कवींपैकीं एकानंहि बंद फाटकावर मुक्तछंदांतली कविता केली नाहीं हें मोठं आश्चर्य आहे असं त्या वेळीं माझ्या मनांत आल्यावांचून राहिलं नाहीं.

मी मागच्या पुढच्या लोकांकडे पाहिलं. माझ्यापुढंच एक चांगला पन्नाशीच्या जवळचा इसम उभा होता. त्यानं एका हातानं सातआठ वर्षांच्या

एका मुलाला धरलं होतं, आणि दुसऱ्या एका तीन चार वर्षांच्या मुलाला खांद्यावर घेतलं होतं. तीं दोघं मुलं त्याला पुनः पुन्हां विचारीत होतीं, 'काका, केव्हां येणार गाडी ?' काका पुनः पुन्हां सांगत होते, 'आत्तां येईल. आलीच ती पहा.'

त्यांचीं तीं प्रश्नोत्तरं दहा बारा वेळां झालीं, आणि मला त्या काकांची कींव येऊं लागली, इतक्यांत एक लोकल गाडी खरोखरच आली. धाड् धाड् आवाज करीत, आणखी कांहींसा गिरणीच्या भोंग्यासारखा भोंगा वाजवीत तें अजस्त्र प्रकरण आमच्यापुढून जाऊं लागलं. खिडक्या खिडक्यांतून हजारों माणसांच्या आकृती क्षणार्धमात्र दिसल्या, आणि दिशेनाशा झाल्या. काकांच्या बरोबरच्या त्या दोन मुलांनीं आरोळ्या ठोकल्या आणि टाळ्या वाजवल्या. थोरल्या मुलानें तर प्रत्येक हाताचीं दोनदोन बोटं जिभेखालीं खुपसून एक कर्कश शिटीदेखील वाजवली. आणि चमत्कार असा कीं मुलांच्या त्या आरोळ्यांत ते काकासुद्धां सामील झाले ! त्यांनींहि रुमाल फडफडावला अन् आरोळ्या ठोकल्या !

गाडी गेली. फाटक उघडलं. उन्हाळ्यांत सांचलेला पाचोळा पावसाच्या पहिल्या सरीनं वाहून जावा तशी फाटकाच्या दोन्ही बाजूस थोपलेली रहदारी दोन्ही दिशांनीं वाहून गेली. मी काकांकडे आणि त्या मुलांकडे पहात राहिलों. काका म्हणत होते, 'काय रे मुलांनो, आतां चालायचं ना घरीं ?' मुलं म्हणालीं, 'नाहीं नाहीं, आणखी एक लोकलगाडी पाह्यची.' काका म्हणाले, 'बरं ठीक आहे; आणखी एक पाहूं. पण आता एकच हं. आत्तांपर्यंत दहा झाल्या; मोजल्या ना आपण ?'

म्हणजे ही मंडळी गाड्या पहावयासाठींच इथं उभी राहिली होती तर ?

काय या पोरखेळाला म्हणायचं ?

आणि या पोरखेळांत पन्नाशीच्या सुमाराचा हा मोठा गृहस्थ खुशाल सामील झाला होता !

मग मी मघाशीं त्या मैदानावरच्या त्या पोरांचं नाचगंबागडणं पहात पंधरा मिनिटं उभा राहिलों त्यांत माझी काय चूक झाली ?

छेः छेः ! माझी मुळींच चूक झाली नाहीं.

माझ्या सारासार विचाराचा चिमटा आतां मला मुळींच बोचेना. कारण, मी मनाशीं म्हणूं लागलों, कीं तसाच विचार केला तर अशा पोरखेळावांचून मनुष्याचं जिणं असह्य होणार नाहीं का बरं? गांभीर्याचं, जबाबदारीचं, प्रतिष्ठितपणाचं ओझं मनुष्य काय अहर्निश डोक्यावर वागवूं शकेल? खेड्यांतून भाजीनं भरगच्च भरलेले हारे डोक्यावर घेऊन शहराकडे लगबग जाणाऱ्या माळिणी तोंडानं गाणीं म्हणतात, अन् वाटेंत मधून मधून डोक्यावरचं ओझं खालीं ठेवून घाम पुसतात. त्याप्रमाणेंच प्रतिष्ठितपणाचं ओझं दूर करून घटकाभर मनाला विरंगुळा घेण्याची संधी माणसानं साधलीच पाहिजे. युरोपियन लोकांत चित्रविचित्र पोशाख करून नाचण्याचे समारंभ होतात तें खचित येवढ्याचसाठीं, कीं प्रतिष्ठितपणाच्या दडपणाखालीं थकलेल्या मोठमोठ्या स्त्री-पुरुषांना पोरखेळ करायला मिळावेत. आपल्याकडेसुद्धां कुठल्या तरी देवाच्या नांवानं जत्रेचे उत्सव होतात ते येवढ्याचसाठीं. अशा जत्रांच्या वेळीं क्षणभर लहान होऊन पाळण्यांत किंवा फिरत्या चक्राच्या लांकडी घोड्यावर अथवा वाघावर बसण्याचा, दोन पैशांची पिपाणी किंवा करकरं घेऊन वाजविण्याचा पोरखेळ जे लोक करीत नाहींत ते मोठे अभागी म्हटले पाहिजेत!

अशा पोरखेळांच्या मसाल्यावांचून जीवितांत गोडी उरायची नाहीं. तें रुचिहीन होईल. त्याचा लवकरच वीट येईल. माणूस आंबून जाईल. त्याचं तारुण्य आणखी त्याचा उत्साह फार दिवस टिकणार नाहीं. म्हाताऱ्याला तारुण्याची पुनः प्राप्ति करून देणारीं रसायनं शोधून काढण्यांत शास्त्रज्ञ गुंतले आहेत. पण, माणसाची जवानी अखंड टिकवणारं 'पोरखेळ' हें एकच रसायन आहे! त्याचं महत्त्व जो ओळखील त्याला कधीं वृद्धत्व येणार नाहीं.

शिष्ट लोकांनीं पोरखेळांचा धिक्कार केला तरी मला तो पटायचा नाहीं. उलट त्यांचा धिक्कार मी ढोंगाचा समजेन. कारण, वस्तुतः तुमची आमची सगळ्यांचीच स्थिति लोकल गाडी पाहून हातरुमाल फडफडविणाऱ्या त्या वयस्क गृहस्थासारखी आहे. पोटासाठीं कराव्या लागणाऱ्या रोजगारामुळं आणखी दाखवाव्या लागणाऱ्या प्रतिष्ठितपणामुळं आपण सगळेच रंजीस आलेले असतों. क्षणभर पोरखेळ करायला मिळाला तर आपल्याला हवा असतो.

पण आपल्याला धैर्य नसतं, आणि स्वतःची वंचना करून घेऊन प्रतिष्ठितपणाचं ओझं आपण तसंच सतत डोक्यावर वागवतों.

पण मी आतां स्वतःची वंचना करून घेणार नाहीं. लोकल गाडीची मी वाट पहाणार; इतकंच नाहीं तर ती आली, कीं आरोळीसुद्धां ठोकणार, आणि वाजवितां आली तर शिटीसुद्धां वाजविणार ! पाहीना कोणीं पाहिलं तर आणि ठेवीना नांवं ! स्वतःची शरम वाटण्याऐवजीं मला त्यांचीच कींव येईल.

★

# अंधारी रात्र! — २ —

त्या दिवशीं माझ्या हातून कांहीं तरी मोठं सत्कृत्य घडलं असलं पाहिजे. तें कोणतं तें आतां मला आठवत नाहीं. आणि आठवत असतं तरी तें मीं सांगितलं नसतं. कारण, सत्कृत्यांचा उच्चार करूं नये असं कुठल्याशा नीतिबोधपाठावलींत मीं वाचलं आहे. तेव्हां माझ्या त्या सत्कृत्यावर प्रसन्न होऊन एक देवता माझ्यापुढें उभी राहिली येवढंच मी सांगतों. तिनं अत्यंत प्रसन्नपणें मला म्हटलं,

'वत्सा, तुला काय हवा तो वर माग.'

मी बराचसा विस्मयचकित झालों, आणि त्या देवतेकडे पहात राहिलों.

सरस्वती, लक्ष्मी, इत्यादि ज्या देवतांचीं चित्रं मीं आजपर्यंत पाहिलीं होतीं त्यांच्यापैकीं ही कोणती देवता माझ्यापुढं उभी आहे त्याचा मी अदमास घेऊं लागलों. पण कोणत्याच चित्राशीं तिचं साम्य असल्याचं मला दिसेना. आमच्या चित्रकारांनीं कधीं जन्मांत देवता न पहातां त्यांचीं चित्रं रंगविलीं असलीं पाहिजेत अशी माझी खात्री झाली, व आमच्या चित्रकलेंत वास्तवता नसल्याबद्दल एक झणझणीत टीकालेख लिहिण्याचा विचार मी करूं लागलों. लेखाचा मथळा मीं ठरविला, आणि प्रारंभीचं वाक्यदेखील मनाशीं जुळविलें. पण तितक्यांत त्या देवतेनं म्हटलं,

'वत्सा, वर माग ना?'

कोणता वर मागावा तें मला चटकन् सुचेना. आपल्या नातवाच्या डोक्यावर छत्रचामरं ढळलेलीं पहाण्याचं भाग्य मागून घेणाऱ्या धूर्त वृद्ध अंधाची गोष्ट त्या वेळेपर्यंत माझ्या वाचनांत आली नव्हती, त्यामुळें वर मागून घेण्याच्या कौशल्यांत मी अगदींच मागासलेला होतों. मी अगदीं गोंधळून गेलों. पण तितक्यांत लहानपणापासून माझ्या मनांत जी इच्छा हजार वेळां आली होती, व

जी प्रत्येक माणसाच्या मनांत केव्हां ना केव्हां तरी आली असली पाहिजे अशी माझी खात्री आहे, ती मला आठवली. मीं त्या देवतेकडे कांहींशा अविश्वासानें पाहिलं व विचारलं,

'देवते, तूं माझी थट्टा तर करीत नाहींस ना? मी मागेन तें तूं देऊं शकशील?'

त्या देवतेनं जणूं माझ्या अज्ञानाची कींव करण्यासाठीं हास्य केलं व नुसती मान हालविली.

तरी मीं पुन्हां विचारलं,

'काय वाटेल तें मागूं? या सृष्टींत कांहीं फेरबदल करायला सांगितला तरी तूं करशील?'

देवतेनं पुन्हां हास्य केलं व मान हालविली.

मीं म्हटलं,

'आमच्या या पृथ्वीवर महिन्यांतून पंधराच दिवस चांदणं असावं ही फार खेदाची गोष्ट आहे. पाळीपाळीनं पृथ्वीवर चंद्रिकेचा वर्षाव करणारे दोन चंद्र असले तर फार बहार होईल! दुसरा चंद्र तूं निर्माण करूं शकशील?'

'हो.'

असं ती देवता म्हणाली तेव्हां प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्राचा आत्मा तर दिव्य स्त्रीच्या रूपानं माझ्यापुढें उभा नाहीं, असा मला क्षणभर भास झाला. मी मनाशीं म्हणालों, मेनकेच्या नादानं स्त्रैण झालेल्या त्या ऋषिश्रेष्ठाला आलंहि असेल हें स्वरूप. कुणीं सांगावं? स्त्रियांच्या नादीं लागणं चांगलं नव्हे असं आमच्या तरुण पिढीच्या पुरुषार्थाचं जतन करण्यासाठीं तळमळणारे पंडित सांगतात तें खरंहि असेल! पण मीं लगेच विचार केला, कुणी का असेना ही देवता? आपल्या पदरांत दुसरा चंद्र पडत आहे तो पाडून घ्यावा झालं. मीं म्हटलं,

'देवते, सध्यांच्या एका चंद्राच्या जोडीला आणखी एक चंद्र तूं निर्माण करावास येवढीच माझी इच्छा आहे.'

'ठीक. तुझी इच्छा पूर्ण होईल. मात्र, मीं नव्यानं निर्माण केलेला दुसरा चंद्र पृथ्वीभोंवतीं एकच प्रदक्षिणा घालील, आणि नंतर—'

'नंतर काय ?' मीं अधीरतेनं प्रश्न केला.

'नंतर तो अंतर्धान पावेल.'

येवढे शब्द उच्चारून ती देवता स्वतःच अंतर्धान पावली.

तिचं दिव्य तेजोवलय माझ्या दृष्टीपुढून अकस्मात् नाहींसं झाल्यामुळें माझ्या डोळयांपुढें मोटी अंधारी आली. बिछान्यावर पडल्या पडल्या मीं डोळे मिटून घेतले.

बऱ्याच वेळानं डोळे उघडून मीं खिडकीबाहेर पाहिलं तों समोर आकाशांत केवढं तरी मोठं चंद्रबिंब तरंगत होतं !

ती रात्र तर अमावास्येची होती.

अमावास्येच्या रात्रीं पूर्ण चंद्र !

केवढी विलक्षण क्रांति !

ही क्रांति मी घडवून आणल्याचं जगाला कुठें माहित होतं ? एडिसन-साहेब हंसला नसेल येवढया मोठ्यानं मी आपल्या मनाशीं हंसलों. आज मानवजातीला मी केवढया तरी मोठ्या नव्या आनंदाची प्राप्ति करून दिली, व हा नवोदित चंद्र माझ्या कर्तृत्वानं निर्माण झाला आहे हें कळल्यावर सारे लोक मला किती धन्यवाद देतील, असे विचार करीत मी त्या प्रफुल्ल चंद्राकडे पहात राहिलों.

पण काय आश्चर्य !—

धन्यवाद तर बाजूसच राहिले, आणि सारे लोक चंद्रद्वयाच्या त्या अपूर्व चमत्कारावर अगदीं रुष्ट झाल्याचे मला लवकरच आढळून आलं !

वर्षारंभीं घेतलेलीं पंचांगं निरुपयोगी झालीं म्हणून जो तो ज्योतिषांना शिव्या देऊं लागला, व ज्योतिषी नव्या चंद्राला शाप देऊं लागले. कवि आणि लेखकहि त्या नव्या चंद्राचं यत्किंचित्‌हि स्वागत करीनात ! एखाद्या व्यापाऱ्याच्या दुकानांतील कांहीं वस्तूंचा भाव एकदम उतरावा त्याप्रमाणें त्यांच्या संग्रहांतील कित्येक शब्दप्रयोगांचं आणि उपमांचं स्वारस्य नाहींसं झाल्याचं त्यांस दिसून आलं. चंद्रकिरणांत रोजच स्नान करणाऱ्या वसुंधरेच्या वर्णनांत वाचकांना गोडी वाटेना ! चंद्रदर्शनानं उचंबळणाऱ्या सागरवीचींत नाविन्याचं स्वारस्य उरलं नाहीं; लावण्यसंपन्न कामिनीच्या मुखाला मुखचंद्र

म्हटल्यानं वाचकांच्या मनाला आल्हाद होईनासा झाला; ललितवाङ्मयांत वर्षानुवर्षं रूढ झालेले कित्येक दृष्टांत निरुपयोगी ठरले ! चंद्राच्या विरहानं झुरणारी चंद्रकमलिनी, आणि निराशाग्रस्त प्रणयिनीच्या हृदयांत माजलेला अमावास्येचा गडद अंधःकार, असल्या सर्व गोष्टी आतां लुप्त झाल्या ! मला अशा होती, कीं कामपीडित प्रणयी युगुलं तरी आकाशांत गतत चंद्र तरंगतांना पाहून आनंदित होतील. पण, या चंद्रवंशीं स्त्रीपुरुषांनींहि नव्या चंद्राविषयीं असंतुष्टताच दर्शविली ! आपल्या प्रणयचेष्टांना चंद्र सदाच साक्षी असावा हें त्यांना रुचेना ! आणि या सर्व गोष्टींहूनहि सृष्टींतील ज्या एका अनुपम सौंदर्याचा माझ्या हातून अजाणता घात झाला होता तें जेव्हां माझ्या स्वतःच्या लक्षांत आलं तेव्हां तर माझ्या सत्कृत्यावर प्रसन्न होऊन त्या देवतेनं निर्माण केलेला तो दुसरा चंद्र, त्याची मुदत संपून केव्हां नष्ट होईल याची मी वाट पाहूं लागलों.

सृष्टींतील तें अनुपमेय सौंदर्य म्हणजे अमावास्येची अंधारी रात्र !

खरंच, अंधारी !

सारी पृथ्वी घनदाट अंधःकारांत गुरफटली गेली असतांना निर्जन प्रदेशांतील एखाद्या लहानशा ओढ्याच्या कांठच्या हिरवळीवर खुशाल उताणं पडून वर आकाशभागाकडे नजर टाकली, कीं जी दिव्य शोभा दिसते तिचं वर्णन कोठवर करावं ? कमीअधिक तेजानं तळपणाऱ्या कोट्यावधि तारका, त्यांच्या फटीफटींतून दिसणारी आभाळाची निळी मखमल, आणि वक्रगतीनं गेलेला आकाशगंगेचा पुसट पुसट पांढरा स्वच्छ फवारा, या दृश्याकडे पहातां पहातां अंतःकरणांतील किती तरी अस्पष्ट खोल भावना जागृत होतात ! मला पक्कं आठवतं, कीं एकदां पहांटेच्या शांत प्रहरीं डोंगरमाथ्यावर स्वस्थ पडून चमचमणाऱ्या असंख्य तारकांच्या थव्याकडे मीं अगदीं टक लावली होती. पाळण्याच्या छताला लोंबणारे मोती ज्या निःशब्द सोप्या भाषेंत बालकाच्या कानांत गोष्टी सांगतात त्या भाषेंत नभोमंडलांतील त्या असंख्य तारका किती मजेमजेच्या रम्य कथा मला सांगत होत्या ! आणि तान्ह्या मुलानं भाबडेपणानं त्या मोत्यांच्या लकाकीकडे पहात त्यांजजवळ आपलं अंतःकरण उघडं करावं त्याप्रमाणें त्या तारकांजवळ मीं माझ्या मनांतील सर्व गोष्टी खुशाल बोलत सुटलों होतों. जें करावयास हवं असून मी केलं नाहीं, जें करावयास नको

असूनहि मी केलं, जें करावसं वाटलं पण साधलं नाहीं, जें साधलं पण नंतर ज्याचा पश्चात्ताप झाला—त्या सगळ्या सगळ्या गोष्टी मी खुशाल सांगत होतों. लौकिकाच्या जगांत बोलतांना जीं बंधनं पाळावीं लागतात तीं सारीं मीं खुशाल झुगारून दिलीं होतीं, सत्य असत्य, प्रिय अप्रिय, हे सगळे भेद विसरून मी बोलल्यावांचून बडबडत होतों, आणि त्या तारका किती लक्षपूर्वक माझी ती बडबड ऐकून घेत होत्या ? बोलतां बोलतां मी थांबल्याबरोबर त्या लुकलुकून मला म्हणत, 'हं, पुढें!' सारी सृष्टि अगदीं शांत स्तब्ध होती. चंद्र आभाळांत सरकतांना दिसला कीं पृथ्वीच्या गतीची जी जाणीव होते तिचासुद्धां उपसर्ग त्या वेळीं नव्हता. सबंध नभोवितान अगदीं जागच्या जागीं स्थिर राहिल्यासारखं भासत होतं! वारा नव्हता! जगाच्या व्यवहारांतील धांवपळ दूर दूर राहिली होती! वरून माझ्याकडे प्रकाशकिरण फेंकणारे ते असंख्य तारकापुंज, आणि खालून माझ्या येवढ्याशा दृष्टींत तें अफाट सौंदर्य सामावून घेण्याचा प्रयत्न करणारा मी, यांखेरीज सृष्टींत दुसरी कोणतीच गोष्ट उरली नव्हती!

ती घटका मी कधींही विसरणार नाहीं; आणि पुन्हां एखाद्या देवतेनं प्रसन्न होऊन मला वर मागण्यास सांगितलं, तर दुसरा चंद्र मागून घेण्याचा वेडेपणा मी कधींही करणार नाहीं! कारण चांदण्या रात्रीप्रमाणेंच अंधारी रात्रहि नयनरम्य आहे याविषयीं माझी आतां खात्री झाली आहे. किंबहुना, अंधाऱ्या रात्रीलाच मी यापुढें चांदणी रात्र म्हणणार आहें! ज्या रात्रीं पूर्ण चंद्र आभाळाच्या निळ्या किनखापी कापडावर एखाद्या उन्मत्त राजाप्रमाणें हळूहळू पावलं टाकीत चाललेला असतो, व एकाहि चांदणीचा मागमूस उरलेला नसतो ती 'चांदणी' रात्र, कीं ज्या रात्रीं रतीच्या शय्येवरील जातिकुसुमांच्या पाकळ्यांप्रमाणें लक्षावधी चांदण्या आकाशभागीं उधळलेल्या दिसतात ती खरी 'चांदणी' रात्र ?

★

# आगेपणाची स्वप्नं ! -३-

'माणसानं रिकाम्या चवकशा करूं नयेत' असं आमचे एक काका आमच्या लहानपणीं आम्हांला नेहमीं बजावीत. त्यांची ती धिप्पाड देहयष्टि, त्या गालमिशा, ते करारी डोळे, तें चक्री पागोटं, आणि त्यांच्या कपाळावरचे ते भस्माचे पट्टे पाहून त्यांच्या उपदेशाविरुद्ध कांहीं बोलण्याची आमची छातीच नव्हती ? पण आम्हीं प्रतिपादलं नाहीं म्हणून त्यांचा तो उपदेश आम्हांला पटला अशी त्यांची कल्पना झाली असली तर ती मात्र त्यांची चूक होती. रिकाम्या चवकशा त्यांच्याजवळ अगर त्यांच्या देखत करायचं आम्हीं सोडून दिलं येवढंच. त्या अजीबात सोडून देणं आम्हांला शक्य नव्हतं, अन् आजमितीलाहि मला तें साधत नाहीं. किंबहुना तें साधावंसं मला वाटत नाहीं. कारण रिकाम्या चवकशा करण्यांत मोठा आनंद आहे अशी माझी खात्री आहे; आणि या आनंदाचा आस्वाद प्रत्येक माणसानं केव्हां ना केव्हां तरी घेतला असेल, निदान घ्यावा असं मला निश्चयानं वाटूं लागलं आहे.

आत्तांच पहा ना, रोजचा टाइम्स मीं वाचला आहे, पण मीं तो अजून दूर टाकून दिलेला नाहीं, जेवल्यानंतर वामकुक्षीसाठीं बिछान्यावर पडल्यावर मी तो पुन्हां वाचणार आहे. त्या अंकांतल्या मोठमोठ्या बातम्या मला अजून वाचायच्या आहेत असं नाहीं. त्या मीं वाचून संपवल्या आहेत. पॅरिस शहरांतल्या गिरणी कामगारांचा संप मोडला, बेल्जममध्यें कोळशाच्या व पोलादाच्या खाणींतले मजूर संप पुकारणार, जेरूसलेम येथें अरबांचे दंगे चालू आहेत, चिनी बंडखोरांचा मोड करण्यासाठीं पांच जपानी जहाजं दाखल झालीं आहेत, हिमालयावर स्वारी करणाऱ्या धाडशी प्रवाशांना बर्फवृष्टीमुळें माघार घ्यावी लागत आहे, इत्यादि मोठमोठ्या घडामोडी मला माहीत झाल्या आहेत; त्यांत मला आतां गोडी नाहीं. मी वाचणार आहे मुखपृष्ठावरच्या आणि आंतल्या पानावरच्या जाहिराती !

मला मुंबईला रहावयास जायचं नाहीं, कांहीं नाहीं. तिथें पण भाड्यानं द्यायच्या बंगल्यांच्या आणि फ्लॅट्सच्या ज्या जाहिराती टाइम्समध्यें येतात त्या मी फार आवडीनं वाचतों! चार सहा खोल्यांचा ब्लॉक भाड्यानं द्यायचा असेल तर मी मनांशीं म्हणतों 'शीः! येवढीशी जागा कशी पुरणार?' जसा कांहीं मी तो ब्लॉक घ्यायलाच निघालों आहें! ही पहा 'कंबाला हिल'-वरच्या एका प्रशस्त बंगल्याची जाहिरात आहे! बंगला मोठा आहे, समुद्र इतका जवळ आहे बंगल्यापासून, कीं वाटलं तर दिवसांतून दहा वेळां जाऊन समुद्रांत बुडी मारून यावं! बंगल्यापुढें लहानशी बाग आहे, मुलांना खेळाय-सवरायला जागा आहे, मागच्या बाजूस नोकरांसाठीं खोल्या आहेत व मोटार ठेवायचा तबेला आहे. महिना भाडं—पण भाड्याचा आंकडा छपाईंत उडाला आहे, नीट दिसत नाहीं. आणि कांहीं का असेना तो आंकडा, मला काय करायचा आहे? मला तो बंगला घ्यायचा आहे म्हणतां कीं काय? छे, छे! पण त्या बंगल्याची ती जाहिरात मला आवडते खरी. मी ती तीन चारदां तरी पुनःपुन्हां वाचणार. ती वाचून मला कां आनंद होतो सांगतां येत नाहीं. पण होतो खरा.

बंगल्यांप्रमाणेंच विकाऊ मोटारींच्यासुद्धां जाहिराती मी वारंवार वाचतों. आज पहा, एक 'ओपेल सलून', एक 'व्हॉक्सॉल टूरर', अशा किती तरी गाड्यांच्या जाहिराती आहेत. त्या सगळ्या मी अगदीं काळजी-पूर्वक वाचणार. ज्याला खरोखरच गाडी विकत घ्यायची आहे तो कदाचित् माझ्याइतक्या लक्षपूर्वक त्या वाचणार नाहीं! 'ओपेल सलून' गाडी बरी आहे, पण जाहिरात देणाराच म्हणतो 'Needs paint', म्हणजे गाडी पुन्हां एकदां रंगवायला पाहिजे. असली गाडी काय कामाची? 'व्हॉक्सॉल' गाडी चांगली म्हणतात, पण तिचा प्रवास पन्नास हजार मैल झाला आहे असं जाहिरातींतच म्हटलं आहे, तेव्हां त्या गाडींत तरी काय अर्थ? ही 'फियाट' गाडी छान दिसते आहे. जवळ जवळ नवीच आहे कीं! अन 'Five seater' म्हणजे पांच स्वाऱ्यांची आहे! आपल्या घरांतल्या सगळ्या मंडळींना घेऊन जायला बरी. छोट्या गाड्या आपल्या काय कामाच्या? प्रसंगविशेषीं फार सोईस्कर अन् सुखाच्या खऱ्या. पण नेहमींच्या उपयोगाला

म्हणजे आपल्याला भली मोठी प्रशस्त गाडीच पाहिजे. एक नामांकित महाराष्ट्रीय नट तर म्हणे आपल्या सर्व कुटुंबियांसह व मित्रपरिवारासह सहल करतां यावी म्हणून मोठं ट्रकच घेणार होते विकत! त्यांनीं तें घेतलं कीं नाहीं मला कळलं नाहीं. पण त्यांची विचारसरणी बरोबर होती. आपल्यालाहि मोठी 'फियाट' गाडीच सर्व दृष्टींनीं सोयीची. तिची किंमत या जाहिरातींत मालकानं दिलेली नाहीं. पण तिच्याशीं मला काय करायचं आहे? मला ती थोडीच विकत घ्यायची आहे? छे, छे! विकत घेण्याचा प्रश्न आलाय कुठें? उगीच चवकशी झालं! मला ती जाहिरात आवडते, ती वाचली कीं मला आनंद होतो येवढंच!

असल्या आनंदाच्या चाळ्यासाठींच मी पुष्कळदां मोठमोठ्या कंपन्यांचे कॅटलॉग मागवितों. आयर्लंडमधील सुती कापड अगर स्कॉटलंडमधील गरम कापड मी वापरणार आहे थोडंच? पण त्या कापडांचीं वर्णनं करणारे सचित्र कॅटलॉग मला वाचावेसे वाटतात. त्यांतलीं तीं टॉवेल्सचीं, पलंगपोसांचीं, पायमोज्यांचीं, ब्लँकेटांचीं चित्रं किती मोहक असतात! कॅटलॉग मागविले कीं पुष्कळदां कंपनीकडून कापडांचे नमुने देखील येतात. ते मी मोठ्या कसोशीनं तपासतों. कोणत्या कापडाचा पुन्हा किती आहे व आपल्याला सूट करायचा झाला तर कोणतं कापड किती वार घ्यावं लागेल हा हिशोबसुद्धां मनाशीं केल्यावांचून मी रहात नाहीं. आमचे शिंपीदादा सहज बसायला घरीं आले असले तर त्यांचा सल्ला घेतों. ते दोन बोटांत धरून कापडाचा एक एक नमुना चाळतात. 'हा बरा आहे, हा अधिक बरा आहे' असं पुटपुटत राहतात, व मग खालीं मान करून चाळशींतून माझ्याकडे पहात विचारतात, 'पण तुम्हांला खरंच करायचा आहे का यांतल्या एखाद्या कापडाचा सूट?' मी उत्तर देतों, 'छे हो, उगीच आपली चवकशी!' ते मान हालवितात, व कापडाचे नमुने माझ्या हातीं परत देतात. मी असल्या चवकशा उगीचच्या उगीच कां कराव्या त्यांना समजत नाहीं. मलाहि त्यांना सांगतां येत नाहीं.

मी बहुधा मोकळ्या रानांत फिरायला जातों पण एखादे वेळीं शहराबाहेर जी नवी वस्ती झाली आहे तिच्या रस्त्यानें गेलों, कीं दोन्ही बाजूंचे लहानमोठे बंगले मी अगदीं बारीक दृष्टीनं पाहूं लागतों. मोठमोठ्या राजवाड्यांसारखे जे

बंगले आहेत तिकडे माझं लक्ष विशेष जात नाहीं: पण लहानसा टुमदार बंगला दिसला कीं मी रस्त्यावर रेंगाळून त्याच्याकडे पोटभर पाहून घेतों. दोन मजली, तीन मजली इमारती मला आवडत नाहींत. बैठा एक मजली बंगला दिसला कीं त्यानं माझं मन आकर्षित होतं. असल्या बंगल्यांच्या विविध तऱ्हा मी पाहून घेतों. पुण्यास असतांना पोलोग्राउंडच्या बाजूला मी फार वेळां फिरायला जात असे. तेथें एका कोपऱ्यावर एक लहानसा टुमदार बंगला होता—अजूनहि कदाचित् असेल—किती छान होता तो! अगदीं साधा, पण भारी सुबक! तिन्हीसांजा झाल्या, कीं त्याच्या पुढच्या दालनांत गुलाबी रंगाच्या दिव्याचा प्रकाश पडलेला दिसे. त्यच्यासमोर रस्त्यावर एक छोटासा पूल होता त्यावर मी बसे, आणि त्या बंगल्याकडे घटकान्‌घटका पहात राही. एकदां संध्याकाळच्या वेळीं त्याचा मालक फाटकापाशीं उभा असलेला पाहून मी त्याच्या जवळ गेलों; आणि त्या बंगल्याचा प्लॅन कोणी केला, त्याच्या 'रफ्‌कास्ट' च्या भिंतींना द्यावयासाठीं कोणता रंग वापरण्यांत आला, त्याला एकंदर खर्च किती आला, इत्यादि सगळी माहिती मी विचारून घेतली. तसलं घर बांधण्याइतका पैसा माझ्याजवळ कधीं सांठणार नाहीं हें मला पक्कं माहीत आहे. पण आपलं कधीं न बांधलं जाणारं घर त्या तऱ्हेचं हुबेहुब असावं अशी माझी इच्छा आहे. त्या घराकडे पहात राहिलं, कीं माझ्या मनाला कसला तरी सूक्ष्म आनंद होत असे खरा. मी ज्या ज्या गांवीं गेलों आहे तेथें तेथें माझ्या अतिशय आवडीचं असं एक एक घर मी ठरवून ठेवलेलं आहे.

रेल्वेच्या टाइमटेबलाचासुद्धां मी पुष्कळदां असा उपयोग करतों. कलकत्त्याच्या, मसूरीच्या, दार्जिलिंगच्या गाड्या पाहून त्यांत सगळ्यांत सोयीची व कमी खर्चाची गाडी कोणती तें मी ठरवितों. त्या त्या ठिकाणच्या हॉटेलांच्या जाहिराती वाचून सर्वांत चांगली उतरायची व्यवस्था कोठें आहे तें मी बघून ठेवतों. काश्मीरला जावयास कोणता मार्ग जास्त सुखाचा तें मोठ्या कसोशीनं मी तपासतों. त्या प्रदेशांत प्रेक्षणीय स्थळं कोणतीं आहेत, लोकांच्या रीतिभाती कशा आहेत, भाजीपाला व फळं विपुल आहेत कीं नाहीं, नदींत राहण्यासारख्या बोटी मिळतात त्यांचे दर काय आहेत, तिकडे जावयास सर्वांत उत्तम ऋतु कोणता, त्या ऋतूंत जावयाचं

झालं तर कपड्यांची काय काय तयारी लागते, इत्यादि त्या गाइडमध्यें दिलेली सगळी माहिती मी अगदीं लक्षपूर्वक वाचून ठेवतों. सीलोनला सुटलों जावयाचं झाल्यास बोटीनं जावं कीं रेल्वेमार्गानं जावं याचा निर्णय करण्यास उपयुक्त माहिती त्या पुस्तकांत दिलेली आहे, पासपोर्ट घ्यायला पाहिजे हेंहि सांगितलं आहे. कोलंबो वगैरे शहरांच्या आसमंतांत प्राचीन संस्कृतीचे अवशेष कोठें कोठें पहाण्यासारखे आहेत त्याबद्दलहि वर्णनं आहेत. तो सारा मजकूर मी नजरेखालून घालतों. एकदां माझ्या लिहिण्याच्या टेबलावर या प्रवासी पुस्तकांचा भारा पडलेला पाहून व तीं वाचण्यांत मी गुंगलों आहे असं बघून मला भेटावयास आलेल्या एका गृहस्थांनीं विचारलं, ‘ प्रवासाची तयारी आहे वाटतं ? ’ मी म्हटलं, ‘ नाहीं बुवा. ’ ते म्हणाले, ‘ मग हीं टाइमटेबलं कशासाठीं चाळीत आहांत ? ’ त्यांना काय सांगायचं ? मी मनाशीं हंसलों व त्यांना विचारलं, ‘ काय चहा घेणार कीं कॉफी ? ’

टाइम्सच्या मुखपृष्ठावरच्या आगबोटींच्या जाहिराती देखील माझ्या आवडीच्या आहेत. पी. अँड ओ. कंपनीच्या, लॉइड ट्रीस्टिनो, एलरमन, डॉलर लाइन, इत्यादि सर्व कंपन्यांच्या बोटींचीं नांवं, त्यांचीं वजनं, त्यांच्या सुटण्याच्या तारखा मी वाचतों. ही पहा चोवीस हजार टन वजनाची ‘ स्टॅटूमोर ’ नांवाची बोट. या बोटीनं मी इंग्लंडला गेलों तर जगप्रसिद्ध ‘ विंब्रल्डन ’ चे टेनीसचे मोठे सामने मला पाह्यला मिळतील. ही बोट फार मोठी आहे, व तिच्यावरच्या सुखसोयी फार नांवाजलेल्या आहेत. दिवसांतून सहा वेळां खावं, पोहावं, गाणं ऐकावं, खेळ खेळावे, नव्या ओळखी करून घ्यावा...मौजच मौज ! निवांत वेळ मिळून लिहिणंहि खूप होईल आपलं ! कांहीं लोकांना बोटींत मळमळतं आणि केबिनमध्यें पडून रहावं लागतं म्हणतात, पण मला तो त्रास खचित व्हायचा नाहीं. कारण लहानपणापासून मला झोंपाळ्यावर बसून मोठाले झोके घेण्याची हौस आहे. तेव्हां बोट हालली तरी मला मजाच वाटेल. किंबहुना दर्या खवळलेला असला म्हणजे तुफानाची काय अवर्णनीय शोभा असते ती आपल्याला पहायला मिळाली तर बहारच होइल ! कपडे काय काय करायला पाहिजेत त्याची मात्र आपल्याला नक्की कल्पना नाहीं, किंवा पासपोर्ट मिळवायासाठीं कोणकोणते विधि करावे लागतात तेंहि

आपल्याला नीटसं माहित नाहीं. पण विलायतेला जाऊन आलेले पुष्कळ मित्र आहेत आपले, विचारूं त्यांना......

अशा प्रकारच्या विचारांच्या तंद्रींत माझ्या हातचा टाइम्सचा अंक केव्हां गळून पडतो, व निद्रादेवी हळूंच येऊन नाजूक हातांनीं माझे डोळे केव्हां मिटते तें मला कळतहि नाहीं. मी कधीं समुद्रपर्यटण केलें नाहीं, व लवकर करीन असा संभवहि फारसा नाहीं. पण टाइम्समधल्या त्या बोटींच्या सुटण्याच्या वेळा मी हजारदां पाहतों. इतकंच नव्हे तर फ्रान्स, जर्मनी, इटली, अमेरिका, जपान इत्यादि देशांतल्या सरकारांनीं प्रवाशांच्या माहितीसाठीं जीं छोटीं, सचित्र पुस्तकं काढलीं आहेत तींहि मागवून वाचतो. या सगळ्या 'रिकाम्या चवकशा'च खऱ्या, पण त्या विलक्षण सुखकारक वाटतात. 'ज्या गांवाला जायचं नाहीं त्याची वाट कशाला विचारायची?' अशी आपल्यांत म्हण आहे. पण या बोधवचनाप्रमाणें माणूस अक्षरशः वागूं लागला तर फार कठीण अवस्था होईल त्याची! मला मोटार घ्यायची नाहीं, घर बांधायचं नाहीं, किंवा परदेशाला जायचं नाहीं. पण या सगळ्या चवकशा मला फार प्रिय वाटतात. कल्पना ही एक माणसाला मिळालेली बहुमोल देणगी आहे. माणसाचं इतर सर्व प्रकारचं वैभव विनाशी आहे, तें त्याच्यापासून लुटून घेतां येईल. पण माणसाचं कल्पनाधन कोण हिरावून घेऊं शकेल? अशी ही कल्पनाशक्तीहि उगीचच्या उगीच आंवरून धरायची? छेः! ती स्वैर सोडावी, अन् तिचं सुख घ्यावं. रिकाम्या चवकशा म्हणजे जागेपणचीं स्वप्नं आहेत! झोंपेंतलीं स्वप्नें सुखाचीं असतात तशींच भयदायकहि असतात. तसं या जागेपणाच्या स्वप्नांचं नाहीं. त्यांचं माधुर्य निरपवाद अन् अवीट आहे! कोणी कितीहि शहाणपणा शिकविला तरी या माधुर्याचा ठेवा सोडायला मी तयार नाहीं.

★

# आरसेमहाल — ४ —

एकदां एका स्नेह्यांच्याबरोबर मी एका साधूंच्याकडे गेलों होतों. माझ्या स्नेह्यांना परमार्थसाधन करायचं होतं. मला चार दिवसांची सुटी कुठें तरी गंमतीनं घालवायची होती. साधूंच्याकडचा मुक्काम आटपून आम्हीं परत निघाल्यावर माझ्या स्नेह्यांनीं मला विचारलं,

'काय, कसे काय वाटले आमचे महाराज तुम्हांला ?'

त्यांच्या महाराजांच्यापेक्षां ज्या शेतावर मी हुरडा खायला गेलों होतों त्या शेताच्या, अन् ज्या विहिरींत मी यथेच्छ डुंबलों होतों त्या विहिरीच्याच गोड आठवणी करण्यांत माझं मन अधिक गुंतलं होतं, त्यामुळें त्यांचा प्रश्न ऐकून मीं म्हटलं,

'तुमचे महाराज होय ? चांगले आहेत कीं !'

माझ्या स्नेह्यांना जें उत्तर हवं होतं तें हें नसावं, कारण ते म्हणाले,

'असं नका सांगूं ; नीट सांगा.'

मीं म्हटलं, 'तुम्ही नीट विचारा, म्हणजे नीट सांगतों.'

'आमच्या महाराजांच्या ठिकाणीं विरक्ति पूर्णांशानं आहे असं तुम्हांला आढळून आलं कीं नाहीं ?'

'विरक्ति ? मला तर निराळीच गोष्ट आढळली !'

'ती काय ?'

'त्यांच्या खोलींत एक भला मोठा आरसा दिसला मला !'

'मग ? तेवढ्या आरशावरून काय तर्क केलात तुम्हीं ?'

'हाच कीं ते विरक्त नाहींत.'

'शाबास ! म्हणजे आरशांत न पहाणं ही तुमच्या मतानं विरक्तीची कसोटी कीं काय ?'

'हो. संस्कृतांत आरशाला काय म्हणतात माहित आहे का तुम्हांला ?'

‘ काय ? ’

‘ दर्पण. ज्यामुळें माणसाचा दर्प वाढतो अशी वस्तु. ’

दर्पण या शब्दाचा तो अर्थ माझ्या स्नेह्यांना त्यावेळीं मीं जरी कांहींशा विनोदबुद्धीनं सांगितला असला तरी विनोदव्यतिरिक्तसुद्धां तो मला नेहमीं सुचलेला आहे. व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीनं तो बरोबर आहे कीं नाहीं कुणास ठाऊक ? पण, ‘ दर्प ’ आणखी ‘ दर्पण ’ यांचा संबंध माझ्या मनांतून कधीं जात नाहीं खरा. कारण, ज्या आरशाला संस्कृतमध्यें दर्पण असं नांव आहे तो माणसाचा एक मोठ्यांतला मोठा खुषमस्कऱ्या आहे असं मला फार फार वाटतं.

वास्तविक, वस्तूचं प्रतिबिंब दाखवणं येवढाच आरशाचा खरा धर्म असायला पाहिजे. पण तो मूळचा धर्म आरशाकडून क्वचितच पाळला जातो. वस्तूचं जसंच्या तसं प्रतिबिंब दाखवण्याचं काम आरशानं केलं असतं तर फक्त सुस्वरूप माणसांनींच आरसे खरेदी केले असते. ऐन तारुण्यानं बहरलेल्या लावण्यसंपन्न तरुणींनींच आरशापुढें बसून केशभूषा करण्याच्या निमित्तानं आपलं प्रतिबिंब न्याहाळण्यांत घटकान्‌घटका घालवल्या असत्या. जवानीचं आणि पराक्रमाचं तेज ज्यांच्या मुखमंडलावर विलसत आहे अशा ऐटबाज पुरुषांनींच आपल्या मिशा वर चढविण्यासाठीं आरशांत पुनःपुन्हां पाहिलं असतं. पण असं कुठें होतं आहे ? पांढऱ्या शुभ्र केसानं आच्छादलेलं, म्हातारपणानं किंचित्‌ हालणारं, खोट्या दातांच्या कवळींनीं जरासं सरळ केलेलं आपलं तोंड आरशांत पाहाण्यासाठीं साठीच्या पलीकडे गेलेले म्हातारबुवासुद्धां कांहीं कमी उत्सुक नसतात ! अन अष्टवक्रा म्हातारी कुब्जासुद्धां आरशांत अखंड पाहून आपल्या मंद दृष्टीनं स्वतःचा कोकिळेचा रंग गोंजारीत आपल्या गलित वक्षःस्थलावरून पदर सांवरण्याचा नखरा करतेच ! एखाद्या नाटकगृहाच्या पुढच्या दालनांत मोठमोठे आरसे टांगलेले असले, कीं त्यांपुढें थबकल्याखेरीज प्रेक्षकांपैकीं एक तरी माणूस पुढें जातो कीं कसं तें निरखून पहा, म्हणजे माझ्या म्हणण्याचा आशय पटेल. आरसा मोठा खुशामत्या. तो ज्याला त्याला म्हणतो, ‘ वा ! काय फक्कड तुझं रूप ! ’ एकाच नव्हे तर अनेक अर्थांनीं आरसा म्हणजे मुलखाचा ‘ तोंडदेखलं ’ बोलणारा मित्र आहे.

त्यामुळें आरशाकडे पहातां पहातां माझ्या मनांत पुष्कळदां येतं, कांचेच्या पाठीला पारा लावण्याची कल्पना ज्या माणसानं प्रथम काढली असेल त्याचे मानवजातीवर केवढे उपकार समजले पाहिजेत ! आरशाचा उपयोग आतां इतका सामान्य झाला आहे, कीं त्या असामान्य कल्पक माणसाला आपण सगळेजण पार विसरून गेलों आहोंत. पण समजा, कुणा सुलतानाच्या एखाद्या जुलमी वटहुकुमानं जगांतले सारे आरसे पार नाहींसे करण्यांत आले तर ? मानवी जीवनांत केवढी क्रांति होईल ! स्त्री-पुरुषांचे लहान-मोठे किती तरी व्यवहार अजिबात थांबतील, कपड्यांच्या तऱ्हा बदलतील, स्त्रियांच्या केशरचनेंतील विविध चमत्कार नाहींसे होतील, पुरुष वसिष्ठ-विश्वामित्रासारख्या दाढ्या वाढवतील-विलासी शृंगारचेष्टांची गोष्ट तर बोलायलाच नको ! अर्धं अधिक मानवी सौंदर्य नाहींसं होईल ! अन् हें जर खरं, मनुष्याला अन्नवस्त्रा-इतकीच-किंबहुना थोडी अधिकच आरशाची गरज आहे हें जर खरं, तर ज्या काळांत आरशाची कल्पना निघाली नव्हती त्या काळांत माणसाचं कसं होत होतं ? स्वतःचं प्रतिबिंब पहाण्याची निसर्गसिद्ध इच्छा मनुष्य कशी तृप्त करून घेत होता ? या प्रश्नाचं असं एक उत्तर सुचण्यासारखं आहे, कीं ज्या काळीं पारा लावलेल्या कांचांचे कृत्रिम आरसे नव्हते त्या काळीं निसर्गातल्या आरशाच्या सहाय्यानं मनुष्य आपली गरज भागवून घेत असावा. निसर्गानं एक मोठा आरसा नेहमीं सुसज्ज ठेवलेला आहे. तो म्हणजे कुठल्याही पाण्याचा पृष्ठभाग. नदीचं पात्र, सरोवरं, लहान लहान डबकीं अगर पाणथळीच्या जागा म्हणजे निसर्गांतले लहानमोठे आरसेच नव्हेत काय ? कृत्रिम आरशांची कल्पना निघण्यापूर्वीं याच आरशांचा उपयोग मनुष्य करीत असला पाहिजे. आपल्याला अशी कल्पना करायला कांहींच हरकत नाहीं, कीं रानटी अवस्थेंत स्त्रीपुरुष जंगलांतल्या एकांत जागा शोधून तिथल्या लहान लहान जलाशयांच्या पृष्ठभागांत डोकावून आपल्या अंगाला रंग फाशीत असतील, गळ्यांत शिंपांच्या, कवड्यांच्या, मण्यांच्या माळा घालीत असतील, आणि मस्तकावर नानातऱ्हेचीं पिसं खोवीत असतील, हो असंच असलं पाहिजे......

पण थांबा हं !

जलपृष्ठ हा आपल्याला वाटतो तसा निसर्गांतला एकच एक आरसा आहे काय? जरा खोल विचार केला तर आपल्याला असं म्हणावं लागायचं नाहीं का, कीं मनुष्य जें जें पहातो त्यांत त्यात त्याला खरं पहातां स्वतःचंच प्रतिबिंब दिसत असतं?...

आपण एक उदाहरण घेऊं. समजा, एका डोंगरमाथ्यावर एक चित्रकार बसला आहे, अन् त्या डोंगराळ मुलखांत रहाणारा एक कातकरी दिवसभर खपून जंगलांतून तोडून आणलेल्या लांकडांची मोळी थोडा वेळ डोक्यावेगळी करून कपाळावरचा घाम पुशीत त्याच्यापासून चार हातांवर उभा आहे. समोर पश्चिम क्षितिजावर सूर्यास्त होत आहे. लालबुंद सूर्यबिंब खालीं खालीं सरकत आहे, क्षितिजरेषेवरच्या डोंगराचे माथे सुवर्ण रंगानं भडकले आहेत, अन् ढगांच्या लहानमोठ्या तरंगत्या तुकड्यांवर हजारों रंगांचे भडक मुलामे चढले आहेत. या दृश्याकडे पहातांच तो कातकरी मनांत म्हणेल, 'दिवस सरला. लवकर पाय उचलला पाहिजे.' उलट चित्रकार मनांत म्हणेल,–कदाचित् मोठ्यांदाही उद्‌गार काढील, 'वाहवा! काय अजब सौंदर्य हें!' दृश्य एकच पण कातकऱ्याला त्यांत सौंदर्य कुठेंच दिसत नाहीं. पण उलट चित्रकाराला त्यांत सौंदर्याचा विलक्षण विलास दिसतो! असं कां बरं व्हावं? त्या देखाव्यांत जर सौंदर्य वस्तुतः असेल तर तें चित्रकाराला, कातकऱ्याला, कुणालाही दिसलं पाहिजे; नाहीं का? पण असं होत नाहीं. अन् याचं कारण येवढंच असलं पाहिजे, कीं चित्रकाराला जें सौंदर्य त्या देखाव्यांत दिसतं तें त्या बाह्य देखाव्यांत नसून त्याच्या अंतःकरणांतल्या सौंदर्याचं तें प्रतिबिंब असतं. कातकऱ्याच्या अंतरंगांत सौंदर्य नाहीं म्हणून त्याचं प्रतिबिंब समोरच्या देखाव्यांत उठणं शक्य नाहीं. सूर्यास्ताच्या त्या दृश्याचं सत्यस्वरूप येवढंच, कीं क्षितिजावर प्रकाश अमुक एका तऱ्हेनें पडला आहे, अमुक एका वजनाचे अन् आकाराचे मेघखंड त्या जागीं तरंगताहेत, अन् त्या ठिकाणचे पर्वत अमुक एका उंचीचीं लहानमोठीं शिखरं वर करून उभे आहेत. यापलीकडे त्या दृश्यांत वस्तुतः दुसरं कांहींच नाहीं. चित्रकाराला त्या ठिकाणीं जें सौंदर्य दिसतं तें त्या स्थलांतलं नाहीं, तर त्याच्या स्वतःच्या मनांतलं आहे. त्याची कलात्मक वृत्ति सुंदर आहे म्हणून त्याला तें दृश्य सुंदर दिसतं.

कुणी म्हणेल कीं निसर्गातल्या जडवस्तूंची गोष्ट सोडा, आणि मानवी सौंदर्याचं उदाहरण घेऊन बोला. पण, या आव्हानाचीसुद्धां भीति वाटण्याचं मला कांहीं कारण नाहीं. जगाच्या दृष्टीनं जी स्त्री अगदीं सामान्य आहे—कदाचित् थोडीशी कुरूपसुद्धां आहे–ती तिच्या वल्लभाला कशी दिसते? कमनीय अन् सुंदरच ना? ती त्याला तशी कां बरं दिसते! सारं जग कुजबुजत असतं, 'याला या पोरींत काय येवढं दिसतं आहे कुणास ठाऊक?' पण, त्याच्या दृष्टीला तिच्या ठिकाणीं सौंदर्याचं ब्रह्मांड दिसत असतं! कारण त्या वेळीं त्याच्या स्वतःच्या हृदयांत प्रणयाच्या उत्कट भावनेचं सौंदर्य उत्पन्न झालेलं असतं, अन् त्या सौंदर्याचं प्रतिबिंब त्याच्या दृष्टीला त्या स्त्रीमध्यें स्पष्ट दिसत असतं. ती स्त्री सुंदर नाहीं असं कोणीं कितीही सांगितलं तरी तो तें कसं मानील? ज्या दोन प्रेमिकांनीं एके काळीं एकमेकांवर मनःपूत प्रेम केलं तीसुद्धां कांहीं कारणानं पुढें प्रेमाचा लोप झाला तर एकमेकाला सुंदर दिसेनाशीं होतात. स्त्री मनांत म्हणूं लागते, 'यांच्या नादीं मी येवढी कां लागलें होतें कुणास ठाऊक?' पुरुष स्वतःशीं म्हणूं लागतो, 'मी हिच्यावर येवढा कां भाळलों होतों कुणास ठाऊक?' अन् या दुर्दैवी चमत्काराचं कारण येवढंच कीं प्रत्येकाचं पूर्वीच्या काळचं सौंदर्य दुसऱ्याच्या अंतःकरणांतल्या सौंदर्यानं बनवलेलं होतं. प्रणयाचा ऐन उल्हास सुरूं झाला, कीं व्यक्तीच्या अंतःकरणांत कांहीं एक विलक्षण अवर्णनीय सौंदर्य निर्माण होत असतं. त्या सौंदर्याचा झोत ज्या दुसऱ्या व्यक्तीवर पडेल ती सुंदर वाटूं लागते. तो झोत संपला कीं त्या दुसऱ्या व्यक्तीचं सौंदर्यही नाहींसं होतं.

सारांश, मनुष्य वस्तुवस्तूंत आपलं स्वतःचं प्रतिबिंब पहात असतो. कुणीसं म्हटलं आहे कीं, ज्याच्या अंतःकरणांत आनंद असेल त्यालाच संसारांत आनंद मिळेल; ज्याच्या अंतःकरणांत सौंदर्य असेल त्यालाच भोंवतालीं सौंदर्य दिसेल. सौंदर्य किंवा आनंद हे वस्तूंचे गुणधर्म नसून मनुष्याच्या अंतःकरणाचे धर्म आहेत.

कुणी विचारील, कीं या गुणाप्रमाणेंच वस्तूंच्या बाकीच्या गुणधर्मांचीही वासलात लावणार कीं काय तुम्ही? सामान्यपणें आपण गुलाबाचं एखादं फूल तोडतों अन् जवळ घेऊन म्हणतों, 'वा! काय छान वास आहे!' किंवा, एखादं

आम्रफल तोंडाला लावून म्हणतों, 'वा! किती गोड आहे!' गुलाबाच्या फुलाचा सुगंध, अन् आम्रफलाचा तो स्वाद तरी त्या फुलाचाच अन् फळाचाच ना? कां तेसुद्धां माणसाच्या अंतःकरणाचेच धर्म, अन् ज्याचं अंतःकरण सुगंधी असेल त्याला फूल सुगंधी वाटेल, किंवा ज्याचं अंतःकरण स्वादिष्ट असेल त्याला फळ स्वादिष्ट वाटेल असं तुम्ही म्हणणार?...

मला सांगतां येत नाहीं मला काय म्हणावं लागेल तें. मी येवढंच म्हणतों कीं, समजा असं म्हणावं लागलं तरी तें जर खरं असलं तर तें तोंडावाटे उच्चारायची आपल्या भीति कां वाटावी? सत्याची कल्पना नेहमींच अशी असते, कीं ती पहातांच सामान्य मनाला थोडासा धक्का बसावा. असत्य आणि अपुऱ्या कल्पनांनीं आपण स्वतःला सदा इतकं गुरफटून घेतलेलं आहे, कीं त्यांतल्या एखाद्या कल्पनेचं आच्छादन कुणी आपल्या अंगावरून दूर करूं लागलं, कीं आतां आपलं कसं होईल अशी आपल्याला भीति वाटते. माणसाच्या या भीतीला न जुमानतां सत्याचा निश्चय करण्याचं काम जो करूं पहातो त्यालाच तत्त्वज्ञ असं मोठं नांव आहे. अर्थात्, त्याला तरी बिचाऱ्याला सत्याचा अखेरचा निर्णय करतां येतो कीं नाहीं हा प्रश्न शिल्लक राहतोच.

पण, सुदैवानं आपल्याला त्या प्रश्नाशीं कांहीं करायचं नाहीं. आरशावरून गोष्ट निघाली म्हणून मीं येवढंच म्हटलं कीं, ज्या वस्तूला आरसा हें नांव आपण दिलं आहे, त्या वस्तूप्रमाणेंच माणसाभोवतालच्या सगळ्याच वस्तू अन् सगळींच माणसं ज्याला त्याला ज्याचं त्याचं प्रतिबिंबच सदा दाखवीत असतात. ज्याच्या अंतःकरणांत सौंदर्य असेल त्याच्या दृष्टीस सुंदर वस्तु पडतात, ज्याच्या अंतःकरणांत संगीत असेल त्याला मधुर स्वर ऐकूं येतात, ज्याच्या अंतःकरणांत स्नेह असेल त्याला मित्र मिळतात, ज्याच्या अंतःकरणांत प्रेम असेल त्याला प्रेमिकांची जोड होते! माणसाच्या अंतरंगाचीं प्रतिबिंबेंच त्याच्या भोवतालच्या वस्तूंत अन व्यक्तींत पडत असतात. जग म्हणजे एक विलक्षण आरसेमहाल आहे!

★

# घरकुलांतलीं दुःखं

५ —

मोठी खळबळ उडाली त्या दिवशीं आमच्या बापूसाहेबांच्या वर्तनानं !

ते वागलेच तसे विक्षिप्तासारखे !

त्यांची होती टेनिसची मॅच. मोठी चुरशीची होती. त्यांचा प्रतिपक्षी त्यांच्याइतकाच निष्णात होता. बापूसाहेब सुरवातीला खेळलेहि चांगले. वाटलं ते जिंकणार. पण, पुढें अकस्मात् काय झालं कुणास ठाऊक ? त्यांचे फटके नीट बसेनात. मधेंच त्यांच्या पायाची शीरही थोडीशी लचकली, ते थोडेसे चिडून खेळूं लागले व त्यामुळें हरूं लागले. अन् मग डाव उलटला. त्यावेळीं ते इतके संतापले, कीं त्यांना इतकं संतापलेलं मीं कधीं पाहिलं नव्हतं. अन् अखेर तर त्यांनीं कमालच केली. त्यांनीं खेळ थांबवला, हातांतली रॅकेट फेंकून दिली, तोंडांतल्या तोंडांत कुणाला कुणास ठाऊक शिव्या दिल्या, अन् ते खुशाल क्रीडांगण सोडून चालते झाले.

लोकांनीं अर्थात् म्हटलं, ' बापूसाहेब महामूर्ख आहेत. '

मी घरीं आलों तों मला कळलं, कीं आमच्या आळींतले भाऊराव संसाराचा त्याग करून त्या दिवशीं संध्याकाळीं संन्यासाची दीक्षा घेणार होते. त्यांच्या त्या दीक्षेचा विधि मोठ्या समारंभानं होणार होता. तो समारंभ घडवून आणणाऱ्या मंडळींपैकीं एक गृहस्थ मला आमंत्रण द्यायला आले होते. ते म्हणाले, ' भाऊराव मोठा थोर पुरुष. संसारानं गांजला होता. बायकामुलांशीं पटत नव्हतं. सदा धुसपुस, भांडणं चाललीं होतीं घरांत. संसार सोडून संन्यास घेतो आहे. छान करतो आहे ! आपण सगळ्यांनीं त्यांचें अभिनंदन केलं पाहिजे ! '

मीं एकदम कांहींशा आवेगानं म्हटलं, ' भाऊराव महामूर्ख आहेत. मी येणार नाहीं समारंभाला. ' ते गृहस्थ दचकून आ वासून माझ्याकडे क्षणभर पहात राहिले, अन् मग निघून गेले.

ते गेले तरी मी पुन्हां एकदां मनाशीं म्हटलं, ‘भाऊराव महामूर्ख आहे!’

कारण, मला कळेना क्रीडांगण सोडून जाणाऱ्या बापूसाहेबांना सगळ्यांनीं महामूर्ख ठरवावं, पण संसार सोडून संन्यास घेणाऱ्या भाऊरावांचा मात्र लोकांनीं गौरव कां करावा तें! दोघांनींही डोक्यांत राख घातली होती; नव्हे का? भाऊरावही एक प्रकारें क्रीडांगण सोडून माणसांतून उठून जात होते; नव्हे का? दोघेही स्वतःच्या त्रासावर उपाय म्हणून तो त्रास टाकून दूर पळाले होते; नव्हे का? मग एक महामूर्ख तर दुसरा कां नाहीं?

खेळांत काय किंवा संसारांत काय, त्रास कोणाला होत नाहीं? मधून मधून डाव कुणाच्या अंगावर उलटत नाहीं? कुणाचा जीव रंजीस येत नाहीं? पण असं झालं म्हणून खेळण्यांतला काय अगर संसारांतला काय, डाव टाकून पळून जाणं यांत शहाणपणाही नाहीं अन् शौर्यही खचित नाहीं.

शहाणपण नाहीं अशासाठीं, कीं एखाद्या गणितांतल्या उदाहरणाचा कठीणपणा असह्य झाला, कीं पाटी-पेन्सिल आदळून दूर जाण्यानं उदाहरण सुटत नाहीं कांहीं! फार तर पाटी फुटते. कूट प्रश्न तसाच राहतो. अन् शौर्य नाहीं अशासाठीं, कीं जी गोष्ट कठिण वाटली ती टाकून तिच्यापासून दूर होणं म्हणजे तिचा विजय अन् आपला स्वतःचा पराभव कबूल करण्यासारखं आहे! शत्रूला शरण जाण्यासारखं आहे! जो शूर असतो तो शत्रूला तोंड दाखवतो; पाठ नाहीं दाखवीत!

संसारांतल्या तापत्रयांनीं वैराग्य येऊन संन्यास घेणाऱ्या व्यक्तीबद्दल आदर काय म्हणून वाटावा मला खरंच कळत नाहीं. दुःख जिंकण्याची ही तऱ्हा भूषणास्पद खचित् नाहीं. दुःख सोडून रानांत पळायचं अन् मग म्हणायचं ‘आतां दुःख मला कसं शिवणार!’ यांत पराक्रम तो कोठला? उलट, दुःखांत राहून, मिळूनमिसळून, त्याच्याशीं खांद्याला खांदा घाशीत जो म्हणूं शकतो कीं, ‘दुःखाच्या धक्क्यानं माझा तोल नाहीं जात’ तो मनुष्यच खरा पराक्रमी.

अशा गोष्टी मनांत येऊन मी पुढें विचार करूं लागलों. दुःखाच्या गर्दींत वावरूनसुद्धां स्वतःला त्याचा धक्का लागूं द्यायचा नाहीं हें शक्य आहे.

या प्रश्नानं जणूं मला आव्हानच दिलं. अन् जेव्हां मी अधिक विचार करूं लागलों तेव्हां मीं म्हटलं, ' हो हो, शक्य आहे. संसारांत राहून सवरून सुद्धां दुःखावर विजय मिळवणं शक्य आहे.'

उगाच कांहीं तरी विधान नाहीं मी करीत. कसं तें पहा हं.

जगांत दुःख आहे तसंच सुखही आहे. कीर्तनाला जमलेल्या माणसांची दोन घटका करमणूक करण्यासाठीं संसारांत काडीभरसुद्धां सुख नाहीं अशा एकांगी विधानाचा पूर्वरंग भरणाऱ्या पोटभरू हरिदासांची गोष्ट सोडली तर कोणीही हें कबूल करील, कीं संसारांत दुःख आहे, पण नुसतेंच दुःख नाहीं, सुखही आहे. माणसाला दुःख सोसवेनासं केव्हां होतं ? तर निसर्गानं वास्तविक त्याच्या हातीं जी सुखाची ढाल दिली आहे ती गंजून फुटली, निकामी झाली म्हणजे ! ज्या माणसाचीं सुखं क्षुद्र असतात त्याला क्षुद्र दुःखं असह्य वाटायला लागतात. संसारातलीं मोठमोठीं दुःखं माणसाला एखादे वेळींच गांठतात. लहानसहान दुःखांची अन् मनस्तापांची संगति मात्र त्याला सदैव सोसावी लागते. अन त्या संगतीला त्रासून जो सारखी चिरचिर करतो, ' नको झाला हा संसार ! ' असं पावलागणिक कुरकुरतो त्याची तशी स्थिति व्हायचं कारण बहुतेक हेंच असतं, कीं ज्या गोष्टींत त्याच्या मनाला सुख मानून घेतां येतं त्या संख्येनं थोड्या आणि जातीनं क्षुद्र असतात. कोणत्याही मनुष्याचा मोठेपणा मला मोजायचा असला, कीं मी काय करतों माहित आहे ? ज्या गोष्टींनीं तो त्रासतो, चरफडतो, त्या गोष्टींचा मोठेपणा मी मोजतों, अन् तितका तो माणूस मोठा आहे असं मी ठरवतों. जेवायला उशीर झाला कीं रागावणारा, भाकरींत करपलेला तुकडा आला कीं संतापणारा, ट्रॅम चुकली, थोडीशी ठेंच लागली, अंगावर चिखलाचे शिंतोडे उडाले, सिगरेट पेटवायला ओढलेल्या दहा काड्या ओलीनं विझल्या, अशा बारीकसारीक निमित्तांनीं त्रासत अन् संतापत राहून आपला सबंध दिवस खराब करून घेणारा माणूस अगदीं मोठा पंडित असला तरी मी नाहीं त्याला मोठा म्हणणार. लहानसहान गोष्टींनीं ज्याला त्रास होतो तो माणूस लहानच. मोठ्या माणसाला संतापवायला, अन् त्रासवायला निमित्तंही फार मोठीं असावीं लागतात.

म्हणजे असं नाहीं का, कीं संसारांतल्या लहानसहान दुःखांनीं–अन् असलीं दुःखंच संसारांत फार आहेत—भंडावून सोडलं तर त्यावर खरा उपाय म्हणजे संन्यास घ्यायचा हा नाहीं, तर अधिक मोठ्या दुःखांत, आणखी त्या दुःखाबरोबरच येणाऱ्या अधिक मोठ्या सुखांत माणसानं उडी घ्यावी हा होय ! जे लोक मोठाल्या कार्यांत पडतात त्यांच्या तोंडावर बहुधा एक प्रकारचं सूक्ष्म स्मित सतत असतं. याचं कारण एवढंच कीं, संसार टाकून पळण्याऐवजीं त्यांनीं आपल्या संसाराचं क्षेत्र, आपल्या सुखदुःखाच्या मर्यादा फार विस्तृत केलेल्या असतात. त्यांना दुःख होत नाहीं असं नाहीं. पण, त्यांचीं सुखं इतकीं मोठीं अन् व्यापक असतात, कीं दुःखाच्या प्रहारानं त्यांचं अंग खरचटत नाहीं !

आपल्या स्वतःच्या कुटुंबांतल्या चार सहा माणसांकडून सुखाऐवजीं दुःखच जास्त मिळूं लागलं तर माणसानं 'नको या मनुष्यजातीची संगत' असं वैतागून म्हणून पळून जाऊं नये तर माणसांच्या आणखी आणखी मोठ्या गर्दींत घुसावं ! असं केल्याबरोबर माणसाचं दुःख कमी होतं कीं नाहीं पहा. आपण मनांतल्या मनांत कितीहि त्रासलेले, उद्विग्न झालेले असलों तरी त्या वेळीं जर आपल्याला चार लोकांत वावरायची वेळ आली, तर कृत्रिम का होईना, तोंडावर हास्य आणावं लागतं आपल्याला. अन् त्या बतावणीचा परिणाम असा होतो, कीं कांहीं वेळानं आपण खरोखरीच प्रसन्न होतों, अन् मनापासून हंसूं लागतों.

एकदां मुंबईस क्रिकेटची मोठी मॅच मी पहात होतों. मोठा रंग चढला होता खेळाला. आनंद भरला होता जिकडे तिकडे. खेळ पहायला जमलेले तीस चाळीस हजार स्त्रीपुरुष-किती उल्हासांत अन् मजेंत होते सगळे ! आरोळ्या, टाळ्या, हंसण्याच्या उकळ्या–ऊत आला होता नुसता. माझ्या शेजारीं बसलेल्या माणसाकडे मीं जरा निरखून पाहिलं, अन् तसं पाहतां पाहतां माझ्या मनांत आलं, या माणसाच्या अंतःकरणांतल्या खोल कोपऱ्यांतसुद्धां दुःख यत्किंचितही नसेल का ? छेः, तसं कधींच शक्य नाहीं. उलट, त्याचा काय नेम, तो या घटकेला बेकार असेल, किंवा उद्यां त्याची नोकरी संपायची असेल, किंवा याच्या घरांत कोणी रुग्णशय्येला खिळून पडलेलं असेल, किंवा याचं आणखी याच्या बायकोचं काल रात्रींच कडाक्याचं भांडण झालेलं असेल ! अन् जी

गोष्ट या माणसाची तीच त्या माणसाची, तीच त्यांच्या पलीकडच्या माणसाची, तीच क्रीडांगणावर जमलेल्या त्या सगळया चाळीस हजार लोकांची! त्यांपैकीं प्रत्येकाच्या संसारांत थोडं फार दुःख होतंच. पण प्रत्येकजण हजारोंच्या गर्दींत सामील झाला होता, आणखी सगळे आपापलं दुःख विसरून आनंदांत मग्न झाले होते. गर्दींत मिसळणं हें आपल्या खाजगी दुःखावर मोठं रामबाण औषध आहे. माणसानं दुःखांतून मुक्त होण्यासाठीं संसारांतून उठून पळून कां जावं? छेः! उलट, आपल्या घरापुरती खिळलेली आकुंचित दृष्टि विस्तृत करावी. शेजारीपाजारी, जातभाई, देशबंधू, मुकीं जनावरं, इतकंच नाहीं, निसर्गसुद्धां आपल्या अंतःकरणाच्या कक्षेंत घ्यावा! मग त्याला कळून येईल, कीं त्याला पूर्वीं माहित नव्हते असे असंख्य आनंदाचे झरे जिकडे तिकडे वाहात आहेत!

मुक्या प्राण्याच्या आणखी निसर्गाच्या सहवासाची जादू तर विलक्षण आहे. सूर्य ऐन माथ्यावर आलेला असतांना संथपणानं तृणांकुर खुडून चरणाऱ्या गाई, तिन्हीसांजांच्या अंधुक उजेडांत गुराख्याच्या पाव्याचे स्वर ऐकत कुरणांतून रेंगाळत परत जाणाऱ्या मेंढरांचा कळप, किंवा अरुणोदय होतांच आपापल्या घरट्यांतून बाहेर पडून कुणीकडे कुणास ठाऊक पण अत्यानंदानं किलबिलाट करीत भरारी मारणाऱ्या पक्ष्यांचा थवा—असलीं दृश्यं पाहून ज्याच्या खासगी दुःखांच्या लोप होत नाहीं असा एक तरी मनुष्य मला कुणी दाखवील का? ज्या ज्या वेळीं मन अत्यंत उद्विग्न झालेलं असतांना मी समुद्राच्या तीरावर जाऊन बसलों, व त्या अथांग जलाशयाकडे, दूरदूर दिसणाऱ्या क्षितिजाच्या अवाढव्य रेषेकडे, आणि अनंत आकाशाकडे मीं टक लावली त्या त्या वेळीं माझ्या मनांतलीं दुःखं पार कुठच्या कुठें नाहींशीं झालीं आहेत. आपली दृष्टि आकुंचित असली कीं आपल्या लहानशा घरकुलांतलीं दुःखं आपल्याला मोठीं वाटूं लागतात, भेडसावूं लागतात. पण तेंच आपल्या घराचं छोटं अंगण सोडून हजारों माणसांच्या सुखदुःखांच्या विस्तीर्ण क्रीडांगणावर आपण पाऊल टाकलं, कीं सूर्य डोक्यावर येतांच पायांखालची सांवली बिंदुमात्र व्हावी त्याप्रमाणें मेसूर वाटणाऱ्या आपल्या क्षुद्र दुःखांची सांवली आपल्याला जवळजवळ दिसेनाशी होते!

संसार म्हणजे एक धकाधकीचा खेळ आहे. त्यांत लागायचंच, खरचटायचंच. पडापडी व्हायचीच. एखाद वेळेस जखमसुद्धां व्हायची; पण म्हणून चिडून तो खेळ टाकून का शहाण्या माणसानं जायचं? नव्हे. उलट, आणखी उत्सुकतेनं, वाढलेल्या ईर्षेनं, आणखी विस्तृत दृष्टीनं त्या खेळांत घुसलं पाहिजे. असं केल्यावर सुखासाठीं अरण्यांत जायला नको. तें सदैव आपल्याजवळच आहे.

मग संन्यास घेणाऱ्या भाऊरावांचं अभिनंदन करायसाठीं मी त्या दीक्षेच्या समारंभाला काय म्हणून जाईन?

मी नाहीं जाणार!

★

# पहिला पांढरा केस! -६-

मी एकदम दचकलों अन् आरशांतल्या स्वतःच्या प्रतिबिंबाकडे अगदीं टक लावून पहात राहिलों !

तो माझ्या दृष्टीस पडेल अशी माझी यत्किंचितही कल्पना नव्हती; त्यामुळें तो दिसतांच मला अत्यंत आश्चर्य वाटलं. अर्थात् केव्हां ना केव्हां तरी तो दिसणार हें मी जाणून होतों. कारण, लवकर म्हणा अगर उशिरां म्हणा, प्रत्येकाच्या दृष्टीस तो पडत असतो. पण त्याचं आगमन आज होईल असं माझ्या ध्यानींमनींही नव्हतं. किंबहुना, मला तो आजपर्यंत कधींही दिसला नसल्यामुळं केव्हां तरी तो दिसणार ही गोष्ट मी अजिबात विसरून गेलों होतों. या कारणानं तो दृष्टीस पडतांच मी चांगलाच चपापलों ! भांबावूनमुद्धां गेलों !

तो कोण तें तुमच्या लक्षांत आलं ना !

डोक्यावरचा पहिला पांढरा केस !

सकाळच्या प्रहरीं दाढी करीत होतों मी. उजव्या बाजूची दाढी संपली होती, आणखी डाव्या कानशिलापासल्या केंसांचा काट मारायसाठीं डाव्या आंगठ्यानं तिथले केंस सारखे करून उजव्या हातांतल्या वस्तऱ्याची धार त्या जागीं टेंकण्याच्या बेतांत होतो तोंच तिथल्या केंसांत एक पांढरा केंस मला दिसला !

मला प्रथम वाटलं, छे, पांढरा केंस असणं शक्य नाहीं. साबणाचा फेस चिकटून राहिला असेल तिथें. म्हणून मी टॉवेलनं ती जागा चोळली अन् पुन्हां आरशांत पाहिलं. तों काय? होताच कीं तो पांढरा केंस तिथं! कांहींशा अधिकच उर्मटपणानं चमकत होता तो !

मग मात्र मी दचकलों, अन् विचार करूं लागलों.

दाढी करणं अन् विचार करणं या दोन्ही गोष्टी एकदम साधतात कीं नाहीं याबद्दल तुमचं काय मत आहे मला माहीत नाहीं. माझा स्वतःचा अनुभव

विचाराल तर दाढी आणखी विचार एकदम करायला कांहीं हरकत आहे असं मला वाटत नाहीं. किंबहुना, विचार करायसाठीं दाढी करायच्या वेळेइतकी दुसरी कोणती वेळ सोयीची असेल असं मला वाटत नाहीं. याचं कारण असं, कीं दाढीच्या निमित्तानं आपल्याजवळ सहसा कोणी असत नाहीं, अन् आपली चित्तवृत्ति बहुधा प्रसन्न असते. सुवासिक साबणाच्या फेसाचा आणखी कुंचल्याच्या मऊ मऊ केंसांचा आपल्या गालांना होणारा स्पर्श, आणि तो फेस वस्तऱ्यानं खरडून काढतां काढतां आपल्या चेहऱ्यावर येणाऱ्या टवटवीचं दृश्य यांच्या योगानं आपण साहजिकच जरा मजेंत असतों. अशी वेळ विचार करायला अनुकूल नाहीं असं कोण म्हणेल? तुमचा अनुभव निराळा असला तर असो, मी स्वतः तरी दाढी करतां करतां मनांतल्या मनांत नव्या नव्या कल्पनांशीं खेळत असतों खरा!

पण ही नेहमींची गोष्ट सांगितली मी. त्या दिवशीं डाव्या कानशिला पाशीं पहिला पांढरा केंस दिसल्याबरोबर जी गोष्ट घडली ती नेहमींपेक्षां निराळी होती. मी विचार करूं लागलों खरा, पण तो दाढी करतां करतां नव्हे तर दाढी करायचं एकदम थांबवून.

तुमच्यापैकीं किती जणांना तरी पहिला पांढरा केंस अजून दिसायचा असेल. तेव्हां तो दिसतांच कोणकोणत्या कल्पना माणसाच्या मनांत येण्यासारख्या आहेत त्याची तुमच्यापैकीं फारच थोड्यांना कल्पना असेल. वरच्या ओंठावरचा पहिला काळा केंस दिसल्याबरोबर यौवनांत पदार्पण करणाऱ्या तरुणाला काय वाटतं त्याचा स्वानुभव मी आतां पार विसरलों आहे. नाहीं तर विरोधन्यायानें त्याचा दाखला मला उपयोगी पडला असता. पण, स्मृति नसली तरी कल्पना चालवून मला असं म्हणतां येईल, कीं मिशीचा पहिला केंस दिसल्याबरोबर तरुण पुरुषाला विस्मयाबरोबरच आनंद आणखी अभिमान वाटत असला पाहिजे! आयुष्यांतलं पहिलं प्रेमपत्र लिहितांना अगर वाचतांना माणसाची मनःस्थिति कशी असते? त्याचं अंतःकरण आनंदानं धडधडत असतं नाहीं कां? उत्सुकताही मिसळलेली असते त्या आनंदांत. इतकंच नाहीं तर प्रेमाचा जो ठेवा मिळाला तो खरोखरच मिळाला ना, अन् कांहीं कारणानं तो आपल्या हातांतून निसटणार तर नाहीं ना, अशा वृथा भीतीनें अंतःकरण कंपितहि होत

असतं! बरोबर याच्या उलट अनुभव माझ्या मस्तकावरचा पहिला पांढरा केंस दिसल्याबरोबर मला आला.

विस्मय वाटला, अंतःकरण किंचित् कंपितही झालं. पण तें आनंदानं नव्हे तर कांहींशा विषादानं!

कारण मला वाटलं, माझी जात एकदम बदलली! पांढऱ्या केंसवाल्यांच्या जातींत मी एकदम जमा झालों!

जन्मसिद्ध जातीची गोष्ट सोडली तर जगाच्या दृष्टीनं माणसांच्या दोनच जाती आहेत. एक काळ्या केसवाल्यांची अन् दुसरी पांढऱ्या केंसवाल्यांची; जुन्या कल्पना अन् गंजलेल्या चालीरीती निर्भयपणानं टाकणाऱ्यांची, अन् नव्या कल्पना आणखी नव्या चालीरीती यांचा नामोच्चार होतांच भीतीनं कापणाऱ्यांची; प्रस्तुताविषयीं असंतुष्ट राहून पुढच्या पराक्रमाची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्यांची, आणि मागच्याचे पराक्रम आठवून त्यांतच संतोष मानणाऱ्यांची; धाडसाची हौस बाळगणाऱ्यांची, अन् परंपरेची पूजा करणाऱ्यांची; सुधारणेचे मनोरथ करणाऱ्यांची आणि पुढें पाऊल टाकायला आढेवेढे घेणाऱ्यांची; संकटांना न जुमानतां क्षितिजाकडे धांव घेणाऱ्यांची आणि जागच्या जागीं बसणाऱ्यांची!

यांपैकीं पहिल्या जातींत मी आजपर्यंत होतों तों एकदम दुसऱ्या जातींत जाऊन पडलों असं मस्तकावरचा तो पहिला पांढरा केंस पाहून मला वाटलं. माझ्या मनांत आलं, लोक मला आतां म्हातारा म्हणणार! मला भीति वाटली तरुण माणसं आतां माझ्याविषयीं आदर दाखवूं लागणार. माझ्याशीं मित्रत्वाच्या अन् प्रेमाच्या नात्यानं तीं वागणार नाहींत! तरुणांच्या आदरासारखी दुसरी आपत्ति नाहीं असं नेहमीं मला वाटत आलं आहे आणखी ती नको ती आपत्ति त्या एका केंसाच्या रूपानं माझ्या मस्तकावर कोसळलेली तर मला स्पष्ट दिसूं लागली!

तो केंस दिसेनासा कसा करतां येईल याबद्दल मी जोरजोरानें विचार करूं लागलों. प्रथम माझ्या मनांत आलं, तेवढ्या केंसाला कात्रीनं छाट मारावी. पण हातांतली कात्री सरसावतांच तेवढा एकच केंस अलगद कातरणं किती कठीण आहे तें माझ्या ध्यानांत आलं! [ नापिकाला कारागीर कां म्हणतात

तेंही तावडतोब ध्यानांत आलं ! ] छे; तो केंस कातरण्यांत कांहीं अर्थ नव्हता, एक तर तो कातरणं सोपं नव्हतं; अन् शिवाय, आत्तां कातरला तरी उद्यां दिसूं लागणारच की तो ! मग माझ्या मनांत आलं, तेवढ्या जागीं कलप लावावा. पण तितक्यांत माझ्यापेक्षां अधिक वयाच्या स्नेह्यांकडून कळलेले अनुभव मला आठवले. कोणी पुनःपुन्हा कलप लावायला कंटाळलेले होते, कोणाच्या केंसांना कलपानं काळयाऐवजीं पिंगट रंग आला होता, आणखी सगळयांचेच केंस कलपाच्या उष्णतेनं खरखरीत झाले होते. आणि शिवाय, हें मी पाहून ठेवलं होतं, कीं कलपानं केंस सुंदर दिसले तरी त्यांचं तें सौंदर्य कृत्रिम आहे हें तावडतोब ओळखूं येतं. दांताच्या डॉक्टरकडून बसवून घेतलेले दांत अतिशय सुंदर दिसतात; पण म्हणूनच ते खोटे आहेत हें तावडतोब उघडकीस येतं ! जी गोष्ट दांतांची तीच केंसांची. छेः, कलप लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं......

मग करावं तरी काय ?

हा पांढरा केंस लपवावा तरी कसा ?—

पण तितक्यांत माझ्या मनानं उचल खाल्ली अन् मी विचार करूं लागलों, कीं हा पांढरा केंस नाहींसा करण्याची अगर लपविण्याची गरज काय आहे ? असेना तो ? जवानी अगर म्हातारपण केंसाच्या रंगावर का अवलंबून आहे ? ती एक मनाची व अंतःकरणाची अवस्था आहे. तारुण्य अगर वार्धक्य विचारांच्या जोमावर अगर शैथिल्यावर अवलंबून आहे. या जगांत ज्यांच्या मस्तकावरचे केंस अगदीं काळेभोर आहेत पण ज्यांच्या अंतःकरणांतील विचार थकलेले आणि भागलेले आहेत असे म्हातारे काय कमी का दृष्टीस पडतात ? ज्यांच्या मस्तकावर काळयाभोर केशकलापाचं आच्छादन आहे पण ज्यांच्या आचारविचारांत यत्किंचित्‌ही जवानी नाहीं अशा व्यक्ती आपल्याला प्रत्यहीं दिसतात. एका राज्याचा एक तरुण वकील परराष्ट्राच्या दरबारांत गेला असतां, 'हा बिनदाढीचा वकील; याला राजकारण काय कळणार ?' असा जेव्हां तेथल्या वृद्ध मंत्र्यांनीं त्याचा उपहास केला, तेव्हां 'शहाणपण केंसांत नसतं !' असा रोखठोक जबाब त्या तरुणानं दिल्याची गोष्ट आमच्या वेळच्या एका क्रमिक पुस्तकांत वाचल्याचं मला आठवतं. शहाणपण जसं केंसांत नाहीं तसंच तारुण्यही केंसांच्या रंगांत नाहीं. मला माझी जवानी कायम ठेवावयाची असेल

तर मला खरी काळजी घेतली पाहिजे माझ्या अंतःकरणाची. तरुण पिढीच्या विचारांशीं, भावनांशीं, महत्त्वाकांक्षेशीं, सुखस्वप्नांशीं समरस होण्याची माझी हौस आणि ताकद मी कायम ठेवली पाहिजे. नव्या जगांत उदय पावणाऱ्या नव्या कल्पनांचं, तत्त्वांचं, आणि सिद्धांतांचं मर्मग्रहण करण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं सतत राहिलें पाहिजे. नव्या सामाजिक अगर राजकीय प्रयोगांची मला भीति वाटण्याऐवजीं उत्सुकता वाटत राहिली पाहिजे. अशा प्रकारें तरुण जगांत मी वृत्तीनं मिसळूं शकलों, कीं माझं तारुण्य सतत कायमच राहील. जोंपर्यंत तरुण पिढीला माझ्या विचारांनीं मी आकर्षित करूं शकतों तोंपर्यंत मी तरुणच राहणार. एका इंग्रज ग्रंथकारानं म्हटलं आहे कीं, 'A man is only as old as the girl who loves him' (ज्या मुलीचं प्रेम पुरुष संपादन करूं शकतो तिचं जें वय तेंच त्या पुरुषाचं वय.)

हें जर खरं तर असेना का तो पांढरा केंस माझ्या मस्तकावर?

तो मी कात्रीनं कापणारही नाहीं किंवा त्याला कलपही लावणार नाहीं.

ज्यांना आपल्या अंतःकरणाच्या तारुण्याबद्दल विश्वास वाटत नाहीं त्यांच्यासाठीं आहेत बाजारांतले सारे कलप.

मला काय करायचे आहेत ते?

अन् शिवाय, या पहिल्या पांढऱ्या केंसानं एक मोठा उपकार केला आहे माझ्यावर. तो हा, कीं आतां पुढें कितीही पांढरे केंस माझ्या मस्तकावर दिसले तरी आश्चर्याचा अगर विषादाचा धक्का मला पुन्हां बसायचा नाहीं...

असं मनाशीं ठरवून मी दाढी करूं लागलों...

पण मन बेटं किती विचित्र पहा! दाढी पुरी करतां करतां दहादां माझ्या मनांत आलं, कीं तो पहिला पांढरा केंस आजच न दिसतां आणखी पांच दहा वर्षांनीं दिसला असता तर बरं झालं असतं!

★

# वाट चुकल्याचा आनंद -७-

मी एकदां वाट चुकलों, आणि मग—

पण कुठली वाट चुकलों अन कशी चुकलों तें आधीं सांगतों.

आश्विनाचे दिवस होते ते, अन् आम्ही महाबळेश्वरला राह्यला गेलों होतों.

आम्हीं ज्या बंगल्यांत राहत होतों तो बाजारपेठेपासून चांगला दोन अडीच मैल लांब होता, अन अगदीं एका बाजूला, जवळजवळ जंगलांत असल्यासारखा होता. महाबळेश्वराच्या सीमेंतला त्या दिशेकडला अगदीं शेवटचा बंगला होता तो. मळलेली वाट त्या बंगल्यापासून चांगली दोनतीन हाकांच्या अंतरावर होती.

एक दिवस काय झालं, दुपारीं तीन वाजतां थोडे कागद विकत आणावे म्हणून मी बाजारांत गेलों. दुकानांत एक मित्र अकस्मात् भेटले, अन त्यांनीं आग्रह केला म्हणून चहा घ्यायला त्यांच्या घरीं गेलों. चहाच्या निमित्तानं बसलों, ओघाओघानं गप्पांवरून गप्पा निघाल्या अन् न कळत खूपच वेळ घालवला मीं तिथें. साडेचार वाजल्याचं कुणीसं सहज बोललं तेव्हां मी दचकून उठलों, आणि चहा देणाऱ्या त्या मित्रांना नमस्कारसुद्धां न करतां त्यांच्या घराबाहेर पडलों. भराभर चालूं लागलों मी रस्त्यानं. कारण घरच्या मंडळींना मी कबूल केलं होतं कीं चार वाजतां मी परत येईन, अन मग फिरायला जाऊं. आतां पोचायला निदान पांच तरी वाजणार होते, मी अगदीं चेवानं चालूं लागलों. बंगल्याचा तो रस्ता पूर्वीं कधीं वाटला नव्हता इतका लांब वाटूं लागला मला. किती उतरचढ करीत अन वळणं घेत गेला होता तो......

तितक्यांत माझ्या मनांत एक कल्पना आली.

मळलेल्या वाटेनं जायच्या ऐवजीं उजव्या हाताकडच्या झाडींत घुसून बंगल्याच्या धोरणानं आपण गेलों तर? आपला किती तरी वेळ वांचेल. केवळ दिशेच्या हिशोबानं पाहिलं तर पोस्ट ऑफिसच्या इमारतीपासून वायव्य दिशेकडे

सरळ रेघ काढली तर आमचा बंगला फार तर पांच सहा फर्लांग असला पाहिजे……

या कल्पनेनं माझ्या मनाचा एकदम निश्चय झाला, आणखी उजव्या हाताकडच्या झाडींत मी घुसलों.

पण, पन्नास साठ पावलं गेलों नसेन तोंच झाडी इतकी गर्द झालेली आढळून आली, कीं अगदीं नाकापुढच्या झाडाखेरीज मला दुसरं कांहींच दिसेना. गर्द झाडीच्या फटीफटींतून आभाळाचे लहान मोठे खवले दिसत होते. पण, त्यावरून दिशेचा अदमास करावा म्हटलं तर सोय होती काय ? छे छे ! मागं वळून पाहून मी आलों कोणत्या दिशेनं हें ठरवूं लागलों तों तें देखील ठरवतां येईना. पुढें जितकी दाट झाडी दिसत होती तितकीच मागंहि दिसत होती. पोस्ट ऑफिसच्या वायव्य दिशेला बंगला होता खरा; पण वायव्य कोणती आणि आग्नेय कोणती हेंच कळेनासं झाल्यावर त्या माहितीचा काय उपयोग होता ? मी अगदीं गांगरून गेलों ! मनाशीं म्हटलं, असं आडमार्गानं जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, परत मोठ्या रस्त्याला जाऊन मिळावं यासारखा दुसरा शहाणपणा नाहीं.

मी वळलों, अन् झाडांच्या फांद्या दोन्ही हातांनीं दूर करीत, त्या दूर करण्यासारख्या नसल्या तर वांकवीत, अन् हिंगण बेटांच्या ठेंगण्या काटेरी झुडपांवरून अलगत ओलांडून पलीकडे पावलं टाकीत जाऊं लागलों. पण, असा बराच गेलों तरी मोठा रस्ता मला मिळेना. तथापि, मी मनाशीं म्हणत राहिलों, आत्तां सांपडेल मोठा रस्ता, जातो कुठें ? मी असं म्हटलं खरं, पण तो जायचा तो गेलाच ! मला तो सांपडेना. मी ज्या वेळीं परत वळलों त्या वेळीं जिकडून आलों तिकडच्या ऐवजीं भलतीकडेच माझी पाठ वळली असली पाहिजे !

मग काय करणार ?

जागच्या जागीं उभं राहून तर कांहींच उपयोग नव्हता. जात राहिलों पुढें तसाच.

अन् मग जेव्हां थोडीशी मळलेली एक पाऊलवाट दिसली तेव्हां जो आनंद झाला तो विचारूं नका. वाटलं, ठीक आहे; आतां मोठा रस्ता लांब नसणार ! 'चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः' या सुभाषिताच्या धर्तीवर एक नवं

सुभाषितसुद्धां त्या आनंदाच्या भरांत मीं मनाशीं तयार केलं ! 'छोटी वाट सांपडली कीं मोठी फार लांब नाहीं म्हणून समजा !'

पण, लवकरच या सुभाषितांत कांहीं अर्थ नाहीं असं माझ्या लक्षांत यायला लागलं. नाहीं तरी कुठल्या सुभाषिताचा व्यवहारांत पडताळा येतो म्हणा !

मी चांगला वीस पंचवीस यार्ड गेलों त्या पाउलवाटेनं, पण मोठा रस्ता सांपडायचं कांहीं चिन्ह दिसेना. भलतीकडेच चालली होती ती वाट !

महाबळेश्वरच्या डोंगराचे कधीं पाहिले नव्हते असे भाग मला दिसूं लागले. ती वाट कुठें जात असावी मला कळेना. चांगलाच घाबरलों मी मनांतल्या मनांत. पावलं पुढें पुढें टाकीत होतों पण मन सारखं कच खात होतं.

अशा प्रकारें बराच चाललों तो एकदम एक खोपट मला दिसलं. एका तुटलेल्या कड्याच्या बरंच अलीकडे होतं तें. खोपट म्हणजे काय, माणसानं पक्ष्याप्रमाणें काड्यामोड्याचं घरटं बांधावं तसलं एक घरटंच म्हणाना ! पण तें पाहतांच मला मनस्वी समाधान झालं. मनांतली भीति बरीचशी गेली. वाटलं, कुठेंहि असलों तरी माणसांत आहे येवढं खास ! धीर आला मनाला. आनंदसुद्धां झाला ! माणसाच्या मनांतल्या विकारांच्या छटा पालटायला किती क्षुल्लक कारणं पुरतात पहा !

त्या तुटलेल्या कड्याच्या माथ्यावर गेलों अन् बसलों जरा वेळ. तेथून जी सृष्टिशोभा दिसत होती ती अपूर्व होती. एका दरीच्या ऐन तोंडावर तो कडा डोकावलेला होता. दोन्ही बाजूंस शेंकडों फूट उंचीचे डोंगराचे कडे दिसत होते. मोठमोठ्या झाडांनीं त्या कडयांचे खडक पार लपून गेले होते. जणूं ते डोंगर नसून एकावर एक उभ्या राहिलेल्या वृक्षांचे प्रचंड थवेच होते. सूर्यप्रकाशांत किती बहारीच्या वाटत होत्या त्या झाडांच्या हिरव्या रंगांच्या विविध छटा ! वारा आला कीं घोंऽऽदिशीं वाजत होता. खालीं दरीच्या तळाशीं पाणवठा होता, आणि शेजारीं दोन खोपटं होतीं. त्या पाणवठ्यापर्यंत पोंचणाऱ्या समोरच्या एका जलौघाचा सारखा आवाज होत होता. खालीं खोपटांत कुठें तरी कुत्रं भोंकत होतं त्याचा आवाज वरपर्यंत स्पष्ट येत होता. एखादा पक्षी त्या दरीचा सबंध विस्तार लीलेनं सहज ओलांडून जाऊन दिसेनासा होत होता, किंवा दुसरा एखादा पक्षी, कोणत्या वस्तूच्या लोभानं कुणास ठाऊक, आपले

पंख पसरून डौलानं तरंगत राहून चोंचेनं विचित्र आवाज करीत होता. उजव्या बाजूच्या कडप्याला एके ठिकाणीं खूप मोठं मधाचं पोळं लागलेलं होतं. हजारों माशा त्याच्याभोंवतीं तरंगत होत्या, अन त्यांच्या घोंगावण्याचा जो एक सतत सूर बनला होता तो कानाला किती मधुर लागत होता ! सृष्टीचं इतकं अकृत्रिम स्वरूप मला कधीं दिसलं नव्हतं. केवढया शांतीनं अन गांभीर्यानं गच्च भरलं होतं तें सारं वातावरण !

सारं भान विसरून मी पहात राहिलों त्या देखाव्याकडे ! तें पाहण्यांत मग्न झाल्यामुळं वर आभाळांत काय काय घटना चालल्या होत्या तिकडे माझं लक्षहि नव्हतं. पण जेव्हां एकदम सोसाट्याचे वारे सुटले, अन एखाद्या रंगभूमी-वरच्या प्रकाशाप्रमाणें सूर्यप्रकाश एकदम मंद झाला, तेव्हां मात्र मीं दचकून वर पाहिलं. तों काय ? काळे काळे प्रचंड ढग माझ्या माथ्यावर येऊन तरंगूं लागले होते. जणूं मोठमोठीं काळया रंगाचीं कुठलीं तरी विमानंच तेथें येऊन हवेंत क्षणभर विसांवा घेत होतीं ! मीं त्या ढगांकडे पुरतं पाहिलंहि नाहीं तोंच वाऱ्याचे वांकडे तिकडे झोत हवेंत उठले, अन् ढगांतून पाण्याचे थेंब पडूं लागले ते मोठाल्या बोरांयेवढाले !

मी आपल्या जागेवरून उठलों अन् खोपटाकडं धांव घेतली. पण, तिथें पोंचेपर्यंत पावसाच्या सरीनं मला पार ओलंचिंब करून टाकलं !

मी त्या खोपटांत शिरलों अन पाहतों तों तिथें आंत कुणीसुद्धां नव्हतं. मला तिथें आंत उभं राहतां आलं असतं तर हवं होतं. पण, तसं करणं मला चमत्कारिक वाटलं, म्हणून मी बाहेर आलों, आणखी खोपटाच्या आडोशाला उभा राहिलों. ज्यांचं तें खोपट होतं त्यांच्यापैकीं एकहि माणूस तिथं नसावं अन् खोपटाचं दार मात्र सताड उघडं असावं याचं मला क्षणभर आश्चर्य वाटलं. पण लगेच मनांत आलं, अशा चन्द्रमौळी घराला रक्षणाची काय जरूरी ?

मी आडोशाला उभा राहिलों, अन् समोर पाहूं लागलों. केवढं उग्र स्वरूप धारण केलं होतं साऱ्या सृष्टीनें त्या वेळीं ! थोड्याच वेळापूर्वीं ज्या आकाशांतून सूर्य तळपला होता त्याच आकाशांत आतां जिकडे तिकडे घनदाट काळया ढगांचा सारखा थर सांचला होता, आणि प्रचंड जलधारा सारख्या खालीं पडत होत्या. त्या धारांच्या गर्द दाटींतून समोरच्या दरीचं मघाचं तें दृश्य

दिसणं अशक्य झालं होतं. अगदीं जवळचेच वृक्ष काय ते दिसत होते, पण त्यांच्यासुद्धां फक्त अस्पष्ट कृष्णवर्ण आकृतीच. जणूं एखाद्या मोठ्या पडद्यावर एखाद्या चित्रकारानं काळ्या रंगाचे मोठमोठे शिडकावे फासून ठेवले होते, अन् त्यांकडे पाहणाऱ्याला तीं झाडं असावींत असा भास होण्यासारखा होता. जलधारांचा वृक्षपर्णांवर पडून होणारा सळसळाट अगदीं कानठळ्या बसवण्यासारखा होता, अन् मध्येंच विजेचा कडकडाट होऊन धूसर आकाशभागावर विलक्षण तेजःपुंज वांकड्यातिकड्या लांबलचक रेघा प्रगट होऊन लुप्त झाल्या, कीं क्षणमात्र ऐकूं येईनासा झालेला तो सळसळाट पुन्हां ऐकूं येऊं लागे. जणूं एखादं राक्षसी हिंस्र श्वापद क्षणमात्र भीतीनं श्वास कोंडून धरून पुन्हां आपला विचित्र चीत्कार नाद करूं लागत होतं. सृष्टीचं तें तांडवनृत्य इतक्या जवळून, त्याच्या ऐन तुफानाच्या मध्यें उभं राहून मीं यापूर्वीं कधी पाहिलं नव्हतं.

मीं सहज माझ्या डोक्यावर दृष्टि वळवली तों त्या खोपटाच्या छपराच्या एका जागीं लहानसं घरटं होतं, अन त्या घरट्यावर दोन पांखरं एकमेकांला बिलगून आपल्या पंखांत चोंची घालून बसलीं होतीं. मधूनच तीं थरथर कांपत, आणि एकमेकांच्या जवळ सरकत. मध्येंच तीं चिवचिवाट करीत आणि एकमेकांच्या चोंचीला चोंच लावीत. जणूं परस्परांच्या भेदरलेल्या जीवांना तीं धीर देत अन एकमेकांला सांगत, ' भिऊं नकोस ! मी आहे ना बरं तुझ्याजवळ ? ' त्या घरट्यांत त्यांचीं पिलं असतील, किंवा पिलांच्या अपेक्षेनं त्यांनीं घरटं बांधून ठेवलं असेल. प्रेमाचं अन् वात्सल्याचं याहून मुग्ध अन् निर्मळ दृश्य दुसरं कुठलं असेल का ? भोंवतालच्या सृष्टींत जिकडे तिकडे घनचक्कर माजली होती, पण एवढ्याशा वीतभर जागेंतल्या त्या घरट्यांत किती मृदु नाजूक भावनांचा विलास चालला होता !

मी किती वेळ त्या घरट्याकडे पहात राहिलों कुणास ठाऊक ? त्याकडे पाहतां पाहतां जलवृष्टीच्या धो धो आवाजाची मला विस्मृति पडली होती, पण तो आवाज जेव्हां मंद झाला तेव्हां मात्र मी एकदम भानावर आलों.

मीं समोर पाहिलं तों पाऊस उघडूं लागला होता. जलधारांची दाटी विरळविरळ व्हायला लागली होती. शत्रूवर एकदम छापा घालून पुढें निघून जाणाऱ्या सैन्याच्या थव्याप्रमाणं ढग भरारा निघून चालले होते. आकाशाचा

निळा रंग पुन्हां प्रगट व्हायला लागला होता. भोंवतालची दाट झाडी पुन्हां स्पष्ट दिसूं लागली होती. दहापंधरा मिनिटांनीं सूर्यप्रकाशहि पुन्हां पहिल्या थाटानं जिकडे तिकडे भरला अन् अखेर पूर्वक्षितिजावर जें प्रचंड इंद्रधनुष्य प्रगट झालं त्याच्या शोभेला उपमा कुठली? किती वहारीच्या रंगाचे रुंदच्या रुंद पट्टे दिमाखानं खडे राहिले होते! आणि काय चमत्कार? दुसऱ्याच क्षणीं इंद्रधनुष्याची ती सबंध प्रचंड कमान माझ्याजवळ जवळ सरकत येत आहेसं मला वाटलं. अगदीं माझ्या अंगावरून गेली असली पाहिजे ती. मीं वळून पाहिलं तों ती अदृश्य झाली होती.

त्या घरट्यांतल्या त्या दोन पांखरांनीं आपले पंख फडफडावले, सारीं अंगं चोंचींनीं साफ केलीं, अन आनंदानं चिवचिव करीत तीं जागच्याजागीं नाचूं लागलीं.

कांहीं झालं तरी मला इथून निघून घरीं गेलंच पाहिजे असा विचार माझ्या मनांत आला. पण पुन्हां वाटलं रस्ता सांपडणार कसा? पण मग काय इथेंच उभं राहून रात्र पडूं द्यायची? जावं त्या पाऊल वाटेनं अन् पहावी नशिबाची परीक्षा, असं मनाशीं ठरवून मी निघालों तिथनं. अगदीं झपाझप चालूं लागलों.

अन् काय आश्चर्य? दहापंधरा मिनिटं असा गेलों नसेन तोंच एकदम हमरस्त्याला पोंचलों मी.

वाट चुकली कशी हें जसं मला कळलं नाहीं त्याप्रमाणं ती अचानक सांपडली कशी तेंहि मला कळलं नाहीं. अन् वाट पुन्हां सांपडल्याच्या आनंदापेक्षां वाट चुकल्यामुळं सृष्टींतल्या अत्यंत उग्र अन् अत्यंत नाजूक अशा दृश्यांचं दर्शन घडून ज्या आनंदानं माझं अंतःकरण डंवरलं होतं तो किती तरी मोठा होता!

पुन्हां केव्हां तरी अशीच माझी वाट चुकावी अशी माझी फार फार इच्छा आहे!

★

# पहाटे उठण्याचा वेडेपणा -८-

माझ्या पुष्कळदां असं मनांत येतं कीं गोरीं माणसं, काळीं माणसं, शांत माणसं, चिडकीं माणसं, अशीं वर्गस्वभावादि भेदानुरूप जीं अनेक वर्गीकरणं आपण नेहमीं करतों त्यांत आणखी एका वर्गीकरणाची भर घालायला हरकत नाहीं. तें वर्गीकरण म्हणजे सकाळीं लवकर उठणारीं माणसं अन् उशीरां उठणारीं. म्हणजे कामधंद्यासाठीं उठलंच पाहिजे म्हणून उठणारीं नाहीं अं! तर ज्यांना लवकर उठणं मनापासून आवडतं तीं. अन् त्याचप्रमाणें उशीरां उठणारीं म्हणजे ज्यांना उशीरां उठण्यांत मनःपूर्वक आनंद वाटतो तीं.

हें वर्गीकरण फार महत्त्वाचं आणखी तर्कशुद्ध होईल असं मी येवढ्याच-साठीं म्हणतों कीं वर्गभेदाप्रमाणेंच माणसांमाणसांतला हा भेद अगदीं मूलभूत आणि अनिवार्य आहे अशी माझी समजूत आहे. निसर्गाकडून माणसाला मिळालेल्या रंगरूपावर जसं औषध नाहीं तद्वतच सकाळीं लवकर अगर उशीरां उठण्याची जी स्वभावसिद्ध प्रवृत्ति आहे तिच्यावरहि कांहीं उपाय नाहीं. आहे का तुम्हीच सांगा!

मला तरी वाटतं, कीं या बाबतींत सारे उपाय व्यर्थ आहेत. कारण मीं स्वतः सकाळीं लवकर उठण्याचे पुष्कळ प्रयत्न करून पाहिले आहेत. पण ते कांहीं केल्या साधत नाहींत. असले प्रयत्न मीं प्रथम केले ते अर्थात् विद्यार्थीदशेंत. पहांटे केलेला अभ्यास जास्ती चांगला होतो या वडील माणसांच्या उपदेशांत मला स्वतःला जरी फारसं तथ्य वाटत नव्हतं तरी तो कसाला लावून पाह्यला आपलं काय जातं, असं एकदां माझ्या मनांत आलं. हा माझा निश्चय ज्या दिवशीं मीं जाहीर केला त्या दिवशीं माझा एक मोठा फायदा झाला, तो असा कीं मला रात्रीं लवकर निजायला मिळालं. कारण लवकर उठायचं म्हणजे लवकर निजलं पाहिजे हें तत्त्व घरांतल्या वडील माणसांना पूर्णपणें मान्य होतं. आमची स्वारी दुसरे दिवशीं पहांटे चार वाजतां उठणार होती ही कांहीं लहानसहान

गोष्ट नव्हती; तेव्हां त्याबद्दलची तयारीसुद्धां अगदीं मोठ्या प्रमाणांत करण्यांत आली. आईपासून तों गडीमाणसांपर्यंत सर्वांनीं अगदीं आणाशपथा घेतल्या, कीं आम्ही पहांटे चार वाजतां तुला हांका मारूं, हांकांचा उपयोग झालाच नाहीं तर तुझं पांघरूण ओढून टाकूं, अन् त्याहिउपर यश आलं नाहीं तर तुझी हरकत नसल्यास तुझ्या कानांत पाण्याची धार सोडूं. अर्थातच माझी या गोष्टीला चांगलीच हरकत होती. झोंपेचा मोह सोडणं मला इतकं कठीण जाईल अशी नामुष्कीची गोष्ट कबूल करणं मला मुळींच पसंत नव्हतं. शिकार हांकलायसाठीं हांक्यांचा तांडा गोळा करणाऱ्या शिकाऱ्याप्रमाणें निद्रेची हकालपट्टी करायसाठीं मीं सारं घर उठवावं यांत मला कमीपणा नव्हता काय? म्हणून मीं माझ्या हितचिंतकांस चक्क सांगितलं, कीं तुमचं सहाय्य मला मुळींच नको. फक्त गजराचं घड्याळ माझ्या स्वाधीन करा म्हणजे झालं. ही गोष्ट कबूल करतांना साऱ्या मंडळींनीं एकमेकांकडे विचित्र कटाक्ष टाकून हास्य कां केलं कुणास ठाऊक? त्या हंसण्यांत मला कुत्सितपणाची थोडी शंका आली, पण मीं तिकडे विशेष लक्ष दिलं नाहीं. 'अखेर हंसतो तो खरा' या सुभाषिताची मीं स्वतःला आठवण करून दिली. पुस्तकांचा ढीग उशागती ठेवला, आणि पहांटे उठण्याचा जो अपूर्व निश्चय मीं केला होता त्याच्या आनंदांत मी निजलों. मला झोंप उत्तम लागली. माणसानं सत्कृत्य केलं किंवा सत्कृत्याचा निश्चय केला, कीं त्याला उत्तम झोंप लागते या तत्त्वाशीं मात्र माझ्या त्या झोंपेचा कांहीं संबंध नव्हता. कारण, मला नेहमींच झोंप छान लागते. दुसरे दिवशीं पहांटे चार वाजतां मी उठणार याबद्दल माझी खात्री होती.

पण मी दुसरे दिवशीं उठलों तों नेहमींप्रमाणेंच उन्हाचे मोठमोठे पट्टे माझ्या खोलींत आले होते, आणखी घरांत माणसांची वर्दळ चालली होती. गाई-म्हशींच्या धारा आटपून त्या चरायला निघाल्या होत्या. त्यांच्या गळ्यांतल्या घंटा पुढच्या दाराकडून ऐकूं येत होत्या. माझ्या लहान भावंडांचे मास्तर ओटीवर गुणाकार भागाकारांतले आंकडे मोठमोठ्यांदा उच्चारीत होते, आणि आंघोळ मिळाल्यानंतर मजेंत आलेल्या पोपटाची चर्पटपंजरी ऐन भरांत आली होती. दुसऱ्या कुणाचीहि मदत न घेतां पहांटे उठण्याचा माझा बेत कां फसला मला कळेना.

घड्याळ तपासून पाहिलं तेव्हां माझ्या लक्ष्यांत आलं, कीं गजराचा खटका चुकीच्या बाजूकडे सरकवून मी रात्रीं निजलों होतों !

दुसरे दिवशीं ती माझी चूक मीं दुरुस्त केली. अर्थात् गजर झाला आणि तो झाल्याबरोबर मी उठलों. पण पहातों तों पुनः साडेसात झालेले कारण गजराचा खटका मी 'सुरू' च्या बाजूला सरकवला होता खरा, पण वेळेचा कांटा चाराच्या ऐवजीं साडेसातवर खुशाल राहूं दिला होता !

तिसऱ्या दिवशीं पुनः प्रयोग करून पाहिला.

पण पुनः मी जागा झालों तों साडेसात वाजतांच !

माझ्या बहिणीनं मला सांगितलं, कीं चार वाजतां गजर व्हायचा तो झाला होता. पण तो बंद करून उठण्याऐवजीं खुशाल डोक्यावरून पांघरूण घेऊन मी पुनः निजलों आणि भोंवतालची मंडळी मला उठवूं लागली तेव्हां रागारागानें मीं त्यांस शिव्या दिल्या होत्या.

पहांटे लवकर उठण्याचा प्रयत्न मीं त्यानंतर सोडला तो कायमचाच. 'लवकर निजे, लवकर उठे' इत्यादि जें वचन आहे त्यांतला पहिला अर्धा भाग तेवढा मला विद्यार्थीदशेंत नेहमीं पसंत असे. पण वडिलांच्या अर्ध्या वचनांत राहण्याच्या माझ्या त्या तयारीचं कोणीं कौतुकच केलं नाहीं. आणि मीहि लवकर उठायची संवय लावून घ्यायच्या भानगडींत पुन्हां पडलों नाहीं !

अन् आतां मोठेपणीं तर लवकर उठण्याच्या फायद्याबद्दलच मुळीं माझा वाद आहे. लवकर निजून लवकर उठणाऱ्या माणसालाच तेवढा आरोग्याचा आणि संपत्तीचा ( संततीचासुद्धां ? ) लाभ व्हावा, आणि उशीरां निजून उशीरां उठणाऱ्या माणसाच्या वांट्याला यांपैकीं एकहि गोष्ट येऊं नये असा कांहीं जगाचा न्याय दिसत नाहीं. आरोग्याच्याच प्रश्नापुरतं पाहिलं तर माणसानं भरपूर झोंप घ्यावी येवढाच खरा नियम समजतां येईल. ती झोंप अमक्याच आठ तासांची असावी या आग्रहाला कांहीं आधार नाहीं. अन् असंसुद्धां म्हणतां येईल, कीं चांगली येत असलेली झोंप टाकून पहांटे धडपडत उठण्यापेक्षां तिचा पूर्ण

उपभोग घेऊन उशीरां उठण्यांतच जास्ती मिजास आहे. निद्रेच्या पाशांत मनुष्यानं आठ तास पडून रहावं हा निसर्गाचा न्याय कबूल. पण तो पाश लवकर ओढून घेऊन त्यांतून घाईघाईनं लवकर बाहेर पडण्यापेक्षां तो गोड पाश शक्य तितक्या आस्ते आस्ते दूर टाकण्यांतच अधिक सुख नाहीं काय? आणि निद्रेच्या कालाची एकंदर तोंडमिळवणी बरोबर करण्यासाठीं रात्रीं तिच्या बाहुपाशांत शिरायला विलंब करून तिचीच आपल्याविषयींची उत्सुकता वाढविण्यांत अधिक काव्य नाहीं काय?

पहांटेच्या वेळीं सृष्टीचं स्वरूप मोठं प्रसन्न असतं असं म्हणतात. मीसुद्धां ही गोष्ट नाकबूल करीत नाहीं. एकदां कोणालासं पत्र लिहिण्याच्या बाबतींत माझ्याकडून मनस्वी विलंब झाला होता. दुसऱ्या दिवशीं पत्र रवाना झालं नाहीं तर त्या माणसाच्या मोठ्या रोषास मी पात्र होईन अशी मला भीति वाटत होती. पण त्या दिवशीं इतर कामापुढें मला सावकाशीनं मोठं पत्र लिहितां येईल अशी तर मला आशा नव्हती, म्हणून त्या दिवशीं मोठ्या प्रयत्नानं मी पहांटे उठलों. तें मला पक्कं आठवतं. मी पत्र लिहायला बसलों तेव्हां भोंवतालीं जिकडे तिकडे किती विलक्षण शांतता पसरली होती! वाऱ्याची थंड झुळूक सुटली होती, चंद्र पश्चिमेच्या क्षितिजावर टेकला होता, त्याच्या फिकट चांदण्यांत झाडाझुडपांच्या आकृति मोठ्या रम्य दिसत होत्या, आणि दूर कुठें तरी उमलूं लागलेल्या फुलांचा वास माझ्या खोलींत चोरून फिरत होता. मला जें पत्र लिहायचं होतं तें लिहितांना या सर्व गोष्टींची मला अस्पष्ट जाणीव होती. आणि त्यामुळें माझी चित्तवृत्ति मोठी प्रसन्न होती. मीं ज्या वेळीं पत्र संपवलं अन् तें बंद करून माझ्या खिडकींतून बाहेर दृष्टि टाकली तेव्हां सृष्टीवरचं मघाचं फिकट चांदण्याचं तें झिरझिरीत वस्त्र दूर झालं होतं, पूर्वेकडच्या क्षितिजावर तांबडा रंग फुटूं लागला होता, झाडाझुडपांना त्याचा मुलामा चढत होता, पक्ष्यांची किलबिल सुरू झाली होती, आणि प्रातःस्नानासाठीं तलावावर जाणाऱ्या माणसांची चाहूल रस्त्यावरून ऐकूं येऊं लागली होती. त्या घटकेला माझं चित्त किती हर्षभरित झालं तें मी सहसा विसरणार नाहीं. पहांटेच्या घटकेंत एक प्रकारची रमणीयता आहे यांत संशयच नाहीं.

पण म्हणून माणसानं पहांटे उठलं पाहिजे अन् त्यासाठीं लवकर निजलं पाहिजे असा आग्रह करण्यांत काय अर्थ आहे? कारण तसंच पाहिलं तर पहांटे उठणाऱ्याला ज्याप्रमाणें सृष्टीच्या एका सुंदर अवस्थेचा अनुभव घेतां येतो, त्याप्रमाणेंच मध्यरात्र उलटून गेल्यावर निजणाऱ्या माणसालाहि घेतां येतो. त्या वेळीं सृष्टीवर विलक्षण स्तब्धता पसरलेली असते. पक्ष्यांची किलबिलदेखील तिचा भंग करीत नाहीं. वारा कधीं स्वैरगतीनं तर कधीं मंद मंद वहात असतो. माझ्या घरासमोर एक लहानसा तलाव आहे, त्याला तर एखाद्या विचित्र आकर्षक गूढाचं स्वरूप त्या वेळेस आलेलं असतं. आणि वर आकाशांत तर शांति, गांभीर्य आणि सौंदर्य यांचा अपरिमित विलास या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत ओसंडून चाललेला असतो. कधीं शुक्राची तेजःपुंज चांदणी एखाद्या राणीप्रमाणें आकाशमार्गावर थबकून उभी असते, कधीं मंगळाचा संतप्त लाल तारा खालीं पृथ्वीकडे पहात असतो, कधीं मृग नक्षत्राचा चौकोन मोठ्या दिमाखानं निळ्या पार्श्वभूमीवर कलंडता मांडलेला दिसतो, अन् त्या मृगाचा पाठलाग करणारा व्याधाचा तारा खऱ्या शिकाऱ्याप्रमाणं अनावर अधीरतेनं चमचम करीत असतो. आकाशगंगेचा दुग्धरंगी पट्टा वांकडा तिकडा पसरलेला असतो. आणि स्पर्धेनं आपापल्या कमी अधिक तेजाचं प्रदर्शन करणाऱ्या असंख्य तारकांची तर जिकडे तिकडे नुसती खेंचाखेंच झालेली असते. तशांत अष्टमीचा चंद्र उगवतांना दिसला तर मग त्या देखाव्याच्या सौंदर्याला सीमाच उरत नाहीं. कवींनीं त्या अष्टमीच्या चंद्राचीं रसभरित वर्णनं केलीं आहेत. तो शुद्ध पक्षांतल्या अष्टमीचा चंद्र म्हणतां काय? छे, छे, माझी खात्री आहे, कीं ज्या कवीनं प्रथम तें वर्णन केलं तो वद्य पक्षांतल्या अष्टमीच्या रात्रीं आपल्या प्रियतमेशीं संकेत करून एखाद्या उपवनांत तिची वाट पहात बसला असला पाहिजे, आणि मध्यरात्रीच्या सुमारास जेव्हां अष्टमीचा चंद्र क्षितिजावर उगवला तेव्हां त्याच्या धवल चांदण्यांत त्याची अभिसारिकाहि दुरून येतांना त्याच्या दृष्टीस पडली असली पाहिजे!

मला तरी पहांटेइतकीच मध्यरात्रीची घटका रमणीय वाटते; आणि लवकर निजून पहांटे उठण्यापेक्षां उशीरां उठायचं ठरवून मध्यरात्रीपर्यंत जागणं मला अधिक शहाणपणाचं वाटतं. कारण पहांटे उठायचं, सृष्टीच्या रमणीय

स्वरूपाकडे डोळे भरून पहायचं आणि आपल्या नित्याच्या नीरस उद्योगाला लागायचं यापेक्षां सृष्टीची मध्यरात्रीची अवर्णनीय शोभा पहायची, आणि त्या सौंदर्यानं कांठोकांठ भरलेले डोळे हलके हलके मिटून घेऊन प्रत्यक्ष पाहिलेल्या सृष्टिसौंदर्याचीं मनोहर चित्रं अंतर्दृष्टीपुढें तरंगत असतांना सावकाश निद्रादेवीच्या कुशींत शिरायचं हा मार्ग अधिक सुखदायक आणि अधिक काव्यमय नाहीं काय ?

आणि काव्याची कसोटी सोडून केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनं पहांटे उठण्याचं महत्त्व कोणी सांगूं लागला तर तेंहि मी मानणार नाहीं. कारण, मी असं सिद्ध करूं शकतों, कीं पहाटेच्याच प्रहराला तेवढं ' रामप्रहर ' म्हणण्याची जी चाल पडली आहे तिच्या बुडाशीं तर्कशुद्धता मुळींच नाहीं. आठ प्रहरांतला अमुकच प्रहर शुचिर्भूत समजण्याचं काय कारण ? काळाच्या ठिकाणीं तत्त्वतः शुचित्वहि नाहीं, किंवा मालिन्यहि नाहीं. पावित्र्य मानण्यावर आहे आणि सारेच प्रहर सारखेच पवित्र मानायला कांहींच हरकत नाहीं. माझी तर दिवसेंदिवस अधिकाधिक दृढ समजूत होत आहे, कीं आमच्या पूर्वजांनीं पहांटे उठण्याचं महत्त्व मानलं तें त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीमुळें. त्या वेळचा समाज कृषिप्रधान होता. समाजांतल्या सर्व स्त्रीपुरुषांनीं जमिनीची मशागत करण्यासाठीं दिवसाचा शक्य तितका अधिक उपयोग करणं अवश्य होतं. सर्वांनीं लवकर उठावं आणि नांगरणी, पेरणी, मळणी अशा कामाला लागावं ही गोष्ट जरूरीची होती, आणि यासाठींच सर्वांनीं पहांटे उठण्याची आवश्यकता होती. आतां तो काळ थोडाच राहिलाय ? आजच्या यांत्रिक युगांत कृषिकर्माखेरीज किती तरी अनेक उद्योग माणसानं अंगिकारलेले आहेत. या उद्योगांचा पहांटे उठण्याशीं कांही एक संबंध नाहीं, इतकंच नाहीं तर यांपैकीं पुष्कळ उद्योग असे आहेत, कीं ते पहांटे उठून करतांच यायचे नाहींत. आणि शिवाय आमच्या पूर्वजांना रात्रीं जागून काय करतां येण्यासारखं होतं ? सभासंमेलनं, नाटकं, गायनादि करमणुकी त्यांना कुठें उपलब्ध होत्या ? ते बिचारे लवकर निद्रावश होत होते तें साहजिकच होतं. पण त्यांनीं जें साहजिक म्हणून केलं तें श्रेय समजायचं कीं काय ? तें श्रेय समजणारा मनुष्य आणि वैश्वदेवाच्या वेळीं बापाच्या लांड्या वस्त्राचा कच्छप

सुटत असे म्हणून तो सोडणं हा त्या विधीचा एक भाग आहे असं मानणारा मनुष्य या दोघांत कोणतं अंतर दाखवतां येईल ? मी तर म्हणतों कीं अमुक मनुष्य किती सुधारलेला आहे हें ठरवायचं असेल तर तो किती उशीरां उठतो हेंच पाहिलं पाहिजे.

आणि याउपरहि कुणी मला पहांटे उठण्याच्या तत्त्वाचं बोधामृत पाजूं लागला तर मी त्याची विनवणी करीन, ' बाबा, माझ्या नादाला उगीच कशाला लागतोस ? तुझा तो रामप्रहर अन् तुझीं तीं गजराचीं घड्याळं तुला लखलाभ असोत. मला त्यांचा कांहीं उपयोग नाहीं !'

★

# आंबट द्राक्षें ? -९-

पाहुण्यानं रिक्त हस्तानं जाऊं नये म्हणून त्याच्या घरीं जातांना मी त्यांच्या दोन मुलांसाठीं खेळणीं घेऊन गेलों. त्या दोन मुलांचीं वयं लक्षांत घेऊनच मीं तीं खेळणीं खरेदी केलीं होतीं. तीं मिळतांच तीं दोन्हीं मुलं खूष होतील अशी माझी कल्पना होती.

पण झालं तें निराळंच.

त्या मुलांपैकीं थोरला मुलगा प्रथम कांहीं वेळ त्याला मिळालेल्या खेळण्यावर खूष होता. पण नंतर धाकट्या मुलीला मिळालेली बाहुली जेव्हां त्याच्या दृष्टीस पडली तेव्हां ती आपल्याला पाहिजे म्हणून तो हट्ट धरून बसला, अन् आपल्या हातांतली आगगाडी त्यानं फेंकून दिली. मीं आणि त्याच्या वडिलांनीं त्याला परोपरीनं सांगून पाहिलं कीं मुलीसारखं बाहुलीशीं खेळणं मुलाला शोभत नाहीं; शिवाय ती बाहुली अगदींच कमी किंमतीची होती अन् ती लवकरच मोडण्या-सारखी होती. आगगाडी किती तरी भारी किंमतीची अन् छान, किल्ली देतांच खोलीच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत भर वेगानं धांवणारी, आणि धांवतांना तिची शिटी वाजत होती ती किती हुबेहूब खऱ्या आगगाडीच्या शिटीसारखी! आमचं म्हणणं त्या मुलाच्या मनावर बिंबवण्यासाठीं आम्हीं चार वेळां ती आग-गाडी किल्ली देऊन फिरवूनसुद्धां दाखवली त्याला! अन दर वेळीं चेहरे असे केले अन उद्गार असे काढले कीं जणूं आम्हांला कुणी ती दिली असती तर आम्ही स्वतःला कृतकृत्य समजलों असतों!

पण त्या मुलाची समजूत कांहीं केल्या पटेना. त्या आगगाडीकडे किंवा एखाद्या पटाईत विक्रेत्याप्रमाणें आम्हीं तिचं जें गुणवर्णन चालवलं होतं त्याकडे त्याचं लक्षच नव्हतं. रडव्या सुरांत त्याचा एकच मंत्र चालू होता!

'मला ती बाहुली पाहिजे.'

त्याच्या त्या विचित्र हट्टानं चिडून त्याचे वडील अखेर त्याच्यावर संतापून ओरडूं लागले, आणखी मीं त्यांना आवरलं म्हणून नाहीं तर त्यांनीं त्याला कदाचित् मारलंहि असतं.

लहान मुलांची ही ठराविक तऱ्हा आहे, नाहीं का? चार मुलांना चार वस्तु तुम्ही द्या. आपल्याला मिळालेल्या वस्तूंवर तीं चारी मुलं संतुष्ट होतील हें कधीं शक्यच नाहीं. स्वतःला जें मिळालं त्यापेक्षां दुसऱ्याच्या हातांतलं अधिक चांगलं असं प्रत्येक लहान मुलाला वाटत असतं.

आणखी तसंच पाहिलं तर ही असमाधानाची वृत्ति मोठ्या माणसांच्या ठिकाणींसुद्धां नसते असं थोडंच आहे? किंबहुना माझ्या भोंवतालच्या प्रत्येक माणसाच्या ठिकाणीं ही वृत्ति मला दिसते.

माझे एक स्नेही चांगले सधन आहेत. कौटुंबिक सुखहि त्यांना चांगल्यापैकीं आहे. चार चौघांत नांवहि चांगलं आहे त्यांचं. पण इतकं असून आपल्या सुखाच्या मिजासींत त्यांनीं जसं असावं तसे ते नसतात. बारीकसारीक दुःखाच्या सबबी सांगून ते नेहमीं तक्रार करीत असतात. घरचा एखादा गडी आजारी पडला, म्हैस वाजवीपेक्षां लवकर आटली, दूर शिकायला असलेल्या मुलाचं पत्र फार दिवसांत आलं नाहीं, सार्वजनिक कामासाठीं फंड जमविणारीं माणसं त्यांच्याकडे वर्गणी मागायसाठीं आलीं, अथवा त्यांच्या ड्रायव्हरनं हलगर्जीपणानं मोटार नादुरुस्त होऊं दिली कीं राईचा पर्वत करून ते माझ्याजवळ आपल्या दुःखाचं गाऱ्हाणं सांगूं लागतात. आणखी दर वेळीं दुसऱ्या कोणाचं तरी उदाहरण देऊन म्हणतात, 'त्यांचं आमच्यापेक्षां पुष्कळ बरं हो. ते आमच्यापेक्षां पुष्कळ सुखी!'

पण हे जे 'ते' ते मला भेटले कीं त्यांचंहि रडगाणं असंच ठरलेलं कीं 'अमका तो पहा, माझ्यापेक्षां किती तरी अधिक सुखी बिचारा!'

एक कॉलेजचे प्रिन्सिपल आणि एक कारकून दोघंहि अगदीं बालमित्र आहेत. दोघांच्या गांठीभेटी आतां क्वचितच पडतात. पण क्वचित् गांठभेट पडली कीं कारकून प्रिन्सिपलला म्हणतो,

'चैन आहे बेट्या तुझी. महिन्याकांठीं बाराशें रुपये घ्यायचे, सातआठशें बँकेंत टाकायचे, अन् चारपांचशेंत मजेचा संसार करायचा!'

पण प्रिन्सिपल त्याला म्हणतो,

'कसली चैन घेऊन बसलास? माझीं दुःखं मला माहीत. कॉलेजांतलीं पोरं आवरणं दिवसेंदिवस व्हायला लागलंय कठीण. प्रोफेसर मंडळीहि किती छळतात तुला काय सांगायचं! शिवाय आमच्यावर आमचे यजमान कुणी तरी आहेतच. ठरलेले अभ्यासक्रम पार पाडायचे, रोजचा पत्रव्यवहार संभाळायचा, परीक्षा घ्यायच्या, स्कॉलरशिपा ठरवायच्या, नोटिसा लावायच्या, व्याख्यानं, खेळांचे सामने असले कार्यक्रम भांडणतंटा होऊं न देतां तडीला लावायचे— एक ना दोन हजार व्यादी मागं असतात. लोकांना वाटतं कॉलेज उन्हाळयांत तीन महिने बंद असतं, मजा असते आमची. पण त्या सुटींतसुद्धां कॉलेजसंबंधींच्या हजार विवंचनांचं दडपण माझ्या मनावर असतं. उलट तुझं पहा, एकदां संध्याकाळीं हात झटकून ऑफिसांतनं परत घरीं आलास कीं होतोस मोकळा तिकडे कोणी काडी ओढून ऑफिस पेटवून दिलं तरी तुला कांहीं चिंता आहे त्याची? मजा आहे बाबा तुझी!'

हीं असलीं बोलणीं ऐकलीं, अन् असले नमुने पाहिले, कीं मला वाटूं लागतं, माझ्याहि मनांत अशा प्रकारचं विचित्र असमाधान आहे कीं काय? आणि आत्मसंशोधन करतांना मला आढळून येतं, कीं या असल्या असमाधानाला मी जरी फारसं वर डोकं काढूं देत नाहीं, तरी तें मुळींच माझ्या अंतःकरणांत नाहीं असं नाहीं मला म्हणतां यायचं.

म्हणजे मनुष्यस्वभावांत अहंमन्यता अन् असंतोष याचं कांहीं एक विचित्रच मिश्रण झालेलं आहे म्हणायचं!

एकीकडे पहावं तर जें जें आपलं तें तें चांगलं असं समजण्याची माणसाची वृत्ति दिसून येते. आपलं घर तेवढं चांगलं अन् बाकीच्यांचीं वाईट, आपली गाडी तेवढी चांगली बाकीच्यांच्या रद्दी, आपली वागणूक तेवढी चांगली, आपलीं तत्त्वं अढळ, आपलीं मतं निर्दोष, आपलं लेखन प्रभावी, आपली कला उच्च दर्जाची असा अहंभाव सगळ्या माणसांत किती खच्चून भरलेला आहे! 'आपला तो बाळ्या, अन् लोकाचं तें कार्टं' ही म्हण कांहींशीं ग्राम्य असली तरी मनुष्याच्या अंतःकरणांतला हास्यास्पद अहंभाव दर्शवण्याच्या दृष्टीनं मोठी मार्मिक नव्हे काय?

पण माझ्यासारख्या मानसशास्त्राच्या अभ्यासकाला गमतीची वाटणारी गोष्ट अशी, कीं या अहंभावाला असंतोषाचा एक विचित्र पदर सदा चिकटलेला असतो. एकीकडे मनुष्य अहंभाव दाखवीत असतो खरा, पण दुसरीकडे असंतोष माणसाच्या मनाला सारखा खात असतो. जीविताच्या बाजारांत इतरांचे सौदे चांगले जमले अन् आपला मात्र आपल्या योग्यतेप्रमाणं जमला नाहीं असं प्रत्येक माणसाला वाटत असतं. अमक्यानं इस्टेट केली, मला मात्र करतां आली नाहीं; अमक्याला कीर्ति मिळाली, मला मिळाली नाहीं; अमका परदेशाला गेला, मला जातां आलं नाहीं; आमका चांगल्या हवेच्या ठिकाणीं रहातो, मला रहातां येत नाहीं; असल्या खोट्या विषादाच्या लाटा प्रत्येक मानवी अंतःकरणांत कमीअधिक प्रमाणानं आदळत असतात आणि दुःख निर्माण करीत असतात. स्वतःला जें मिळालं अन् जें करतां आलं त्याची किंमतच माणूस कधीं नीट समजून घेत नाहीं. आणि त्यामुळें दुसऱ्याला जें साधलं अन मिळालं त्याचीच किंमत त्याला अधिक वाटत असते. प्रारंभीं सांगितलेल्या माझ्या मित्राच्या अजाण हट्टी मुलासारखेच आपण सगळे आहोंत.

इसापनीतींत ' कोल्हा आणि द्राक्षं ' नांवाची जी एक गोष्ट आहे ती मला जेव्हां जेव्हां आठवते तेव्हां तेव्हां ती थोडीशी चुकलेली आहे असं मला वाटतं. त्या गोष्टींत एक कोल्हा द्राक्षांच्या वेलीखालीं जातो, त्याला तीं द्राक्षं खावींशीं वाटतात, तो पुष्कळ धडपड करतो, पण त्याच तोंड कांहीं त्यापर्यंत पोंचत नाहीं, तेव्हां अखेर, ' काय करायचीं आहेत तीं आपल्याला द्राक्षं ? आंबटच आहेत तीं ! ' असं स्वतःच्या मनाचं समाधान करून घेत तो निघून जातो. अशीच आहे ना ती गोष्ट ? त्या गोष्टीनं इसापला असं सुचवायचं होतं, कीं सारीं माणसं कोल्ह्यासारखी आहेत.

पण मला वाटतं, तसं नाहीं. मनुष्यस्वभाव तसा नाहीं. निदान केवळ तसाच नाहीं. आणि त्या स्वभावाला जी दुसरी बाजू आहे ती सूचित करायसाठीं ' कोल्हा आणि द्राक्षं ' या मथळ्याखालींच का होईना पण दुसरी एक गोष्ट लिहायला पाहिजे. ती अशी कीं, एक कोल्हा होता. त्याच्याजवळ द्राक्षं होतीं आणि तो तीं खात होता. चांगलीं गोड होतीं तीं. पण ती खाण्यापेक्षां

त्याचं लक्ष सारखं उंच वेलीवर असलेल्या द्राक्षांकडे होतं. सारीं आंबट द्राक्षं होतीं तीं. निदान तो जीं द्राक्षं खात होता त्यांपेक्षां अधिक गोड होती, असं कांहीं निश्चयानं सांगतां येण्यासारखं नव्हतं. पण त्या वेड्या कोल्ह्याला मात्र वाटत होतं कीं, आपल्या आवाक्याबाहेरचीं तीं द्राक्षं फार गोड असलीं पाहिजेत. आणि या भ्रमामुळं हातांतलीं गोड द्राक्षं खात असतांना त्या कोल्ह्याचा चेहरा मात्र आंबट झाला होता !

इसापनीतींतल्या कोल्ह्यापेक्षां या माझ्या नव्या गोष्टीतल्या कोल्ह्या-सारखीच साऱ्या माणसांची स्थिति आहे. जीं सुखं वांट्याला आलीं तीं माणसाला गोड वाटत नाहींत. जीं त्याच्या वांट्याला आलीं नाहींत तीं अधिक गोड असलीं पाहिजेत, अशी तो स्वतःची कल्पना करून घेतो; आणि भ्रमानं तो स्वतःला दुःखी–कष्टी करून घेत असतो. जीं द्राक्षं हातीं नाहींत तीं आंबट असलीं पाहिजेत असं म्हणायला मनुष्य शिकेल तर तो खरोखर किती तरी अधिक सुखी होईल !

★

# उघडं गुपित



माणसाचं शारीरिक सौंदर्य अथवा कुरुप पाहाणाऱ्याला चटकन दिसण्यासारखं असतं. त्याच्या अंतःकरणाचे धर्म मात्र असे सहजासहजीं दिसण्यासारखे उघड नसतात. दृष्टीची वक्रता सहज उघड होते; पण अंतःकरणाची वक्रता सहसा लक्षांत येत नाहीं. भालप्रदेशाचा संकोच कुणालाही दिसतो; पण अंतःकरणाचा संकुचितपणा आणि क्षुद्रता लक्षांत यायला उशीर लागतो. दिसायला तरतरीत पण वास्तविक मतिमंद आणि दुष्ट, दिसायला तिरस्करणीय आणि कठोर पण वास्तविक उदार आणि प्रेमळ, दिसायला भेकड पण वास्तविक शूर आणि साहसी—असे माणसांचे नमुने या जगांत पुष्कळ आहेत. किंबहुना माझ्या मनांत कधीं कधीं असं येतं कीं, नाटकांत किंवा सिनेमांत नायक—नायिकांची व खलपुरुषांची निवड आणि सजावट ज्या तऱ्हेनं आपण करतों तिच्यांत सूक्ष्म कौशल्याचा आणि कलेचा भाग जरा कमीच असतो. खलपुरुषाचं सोंग काढायचं म्हटलं, कीं आपण अशा धटिंगण कठोर चेहऱ्याच्या माणसाची निवड करतों कीं त्याला पहातांच प्रेक्षकांना वाटावं कीं, 'हां, हा खलपुरुष बरं का!' त्याच्या वेषभूषेंतही आंकडेबाज मिशा, फिस्कारलेले केंस, तांवडे लाल डोळे, इत्यादि सामुग्रीची आपण भर घालीत असतों. पण कलासौंदर्याच्या दृष्टीनं हा एक प्रमाद आहे. असा गमतीचा नवा प्रयोग कोणी दिग्दर्शक कां करून पहात नाहीं कीं, नाटकाच्या अगर चित्रपटाच्या प्रारंभीं प्रेक्षकांना जो दुर्जनासारखा वाटला तो अखेर उदात्त प्रेमळ नायक ठरावा, आणि प्रारंभीं बोलण्याचालण्यांत सुकुमार आणि दिसण्यांत जो सज्जन वाटला तो अखेर दुष्ट खलपुरुष ठरावा? असं केल्यास प्रेक्षकांना कथानकांतल्या पेंचप्रसंगांनीं जो विस्मयाचा धक्का बसायला हवा असतो त्यांत पुष्कळ भर पडेल ही एक गोष्ट; अन् शिवाय संसाराचं चित्र अधिक प्रामाणिकपणानं रंगविल्यासारखं होईल ही दुसरी!

कारण आपल्याभोंवतीं वावणाऱ्या माणसाची सुष्टता अगर दुष्टता बहुतांशीं गुप्त असल्याचं आपल्याला आढळून येत नाहीं का बरं? एखाद्याचा स्वभाव पुरतेपणीं ओळखायचा झाला तर आपल्याला किती तरी वेळ लागतो. ज्यांच्या बाह्य सौंदर्यावर, डामडौलावर अन् मधुर भाषणावर सारी दुनिया भाळली, आणि ज्यांच्या अंतःकरणाचा कृष्णवर्ण दीर्घकालानंतर लोकांना समजला अशा स्त्री-पुरुषांचीं चरित्रं इतिहासांत कांहीं थोडीं नाहींत. आणि अशाही व्यक्तींचे दाखले इतिहासांत सांपडतात, कीं ज्यांच्या कुरूपतेमुळं आणि कटु भाषणामुळं लोकांनीं गैरसमज करून घेतले आणि ज्यांच्या बुद्धीचा आणि अंतःकरणाचा थोरपणा लोकांच्या ध्यानांत लवकर आला नाहीं. या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे असंच म्हणावसं वाटतं कीं, कुणाचंहि अंतःकरण ओळखणं फार कठीण आहे. कानांत आणखी डोळ्यांत असणारं चार बोटाचं अंतर महत्त्वाचं मानतात, पण माणसाच्या नाकांडोळ्यांत अन् अंतःकरणांत तर मोठं अंतरच केवळ नव्हे तर विरोधसुद्धां असतो! 'अंतःकरण' या शब्दाचा अर्थच मुळीं असा, कीं जें आंत कुठें तरी आहे, सहसा दिसत नाहीं, ओळखतां येत नाहीं.

पण हा सिद्धांत काढायचीही मनाची एकदम तयारी होत नाहीं.

कारण माणसाचा स्वभाव ओळखणं कठीण आहे असं जितके वेळां आपल्याला वाटतं तितकेच वेळां तें सोपं आहे असं वाटूं लागण्यासारखा प्रत्ययही आपल्याला येतो. माणसाचं अंतःकरण गुप्त खरं, पण तें अनेक प्रकारांनीं व्यक्त होत असतं. बोलण्याचालण्यांत, दृष्टिक्षेपांत, हातवाऱ्यांत, हंसण्यांत, बसण्याउठण्यांत, त्याच्या स्वभावांतल्या सुष्ट दुष्ट छटा कुशल निरीक्षकाच्या नजरेला दिसल्यावांचून रहात नाहींत. अमुक माणूस मोकळ्या अंतःकरणाचं आहे, अन् अमुक खोल अंतःकरणाचं आहे असं आपण पुष्कळदां बोलतों खरं, पण हें बोलतांना वास्तविक आपल्या हातून शब्दविरोध घडत असतो. कारण अमुक व्यक्ति खोल अंतःकरणाची आहे हें जें आपण ठरवितों तें तरी त्याच्या स्वभावाचा खोलपणा आपल्याला कळल्यावरच ना? मग जो खोलपणा आपल्याला उघड दिसला त्याला खोलपणा म्हणण्यांत मर्म काय उरलं? तेव्हां खरी गोष्ट हीच, कीं मनुष्याचं अंतःकरण गुप्त खरं; पण परोपरीनं

व्यक्त झाल्याविना त्याला राहवतच नाहीं. स्त्रियांना दीर्घकाल कोणतीही गोष्ट गुप्त ठेवतां येत नाहीं असं समजण्याचा परिपाठ आहे. तो खरा असेल तर मानवी अंतःकरण स्त्रीसारखं आहे असंच म्हटलं पाहिजे. व्याकरणांत तें नपुंसकलिंगी खरं, पण व्यवहारांत तें स्त्रीलिंगीच ठरेल !

म्हणूनच माणसाचा स्वभाव ओळखण्याच्या नाना प्रकारच्या पद्धती प्रचलित आहेत. जन्मकुंडलीवरून, डोक्याच्या ठेवणीवरून, हस्तरेषांवरून स्वभाव वर्तविण्याचीं शास्त्रं बनविण्यांत आलीं आहेत तीं कोणत्या आधारावर ? माणसाचं अंतःकरण मोठं चहाडखोर आहे म्हणूनच ना ? पावलांच्या ठेवणीवरूनसुद्धां माणसाचा स्वभाव ओळखतां येतो म्हणतात. अन् मला या गोष्टीचं आश्चर्य वाटत नाहीं. मी तर उलट म्हणतों, कीं हीं शास्त्रं येवढ्यावरच कां थांबावीत ? ज्या तऱ्हेचीं चित्रं माणसाच्या बसायच्या खोलींत असतील त्यांवरून, ज्या तऱ्हेची घट्ट अगर सैल टोपी व्यवस्थितपणें अगर मागेंपुढें सरकवून किंवा तिरपी कलती ठेवून माणूस घालतो त्यावरून, किंवा विडा करतांना माणूस ज्या तऱ्हेनं पानं भरतो अन् चुना लावतो त्यावरूनसुद्धां माणसाचा स्वभाव वर्तविणं बऱ्याच अंशीं शक्य आहे !

शक्य आहे असं मी कां म्हणतों तें सांगतों. माणसाचे हर्षखेदादि विकार ज्या वेळीं विशेषेंकरून उचंबळून येतात त्या वेळीं त्याच्या आवाजावर, भाषेवर, गतीवर, चेहऱ्यावर इतकंच नव्हे तर खाण्यापिण्यांतल्या त्याच्या रुचीवर आणि कपड्यालत्त्यांच्या पद्धतीवरसुद्धां त्यांचा परिणाम झालेला आपणांस दिसून येतो ना ? संतप्त झालेला मनुष्य हळू आवाजांत बोललेला कधीं मी पाहिला आहे ? शोकार्त मनुष्य भराभरा पावलं टाकीत गेलेला कधीं कुणाला दिसला आहे ? दुःखी कष्टी मनुष्य भडक पोषाख कधीं करील काय ? आनंदातिशयानं प्रफुल्लित झालेल्या माणसाचा आवाज घंटानादासारखा खणखणीत वाटल्यावांचून राहील ? अंतःकरणांतल्या भावना ज्या ज्या वेळीं उत्कट होतात त्या त्या वेळीं माणसाच्या चेहऱ्यावर, त्याच्या शब्दांत आणि त्याच्या हालचालींत त्यांचा आविष्कार झाल्यावांचून रहात नाहीं. अंतकरणांतले विकार अन् त्यांचा आविष्कार यांचा इतका ठराविक समन्वय आहे, कीं एका अमेरिकन पंडितानं तर, मुद्दाम वेड पांघरूनच कीं काय कुणास ठाऊक, असा प्रश्न उपस्थित केला कीं, मनोविकार

आणि त्या विकाराच्या वेळचे शरीरव्यापार यांपैकीं कारण कोणतं आणि कार्य कोणतं ? लोकांना कोडं घालायची त्याला हौस असावी. तो म्हणाला, मला तर वाटतं कीं ज्यांना आपण मनोविकार समजतों ते वस्तुतः देहव्यापारच होत. मनुष्य हुंदके देऊन अश्रू ढाळूं लागला कीं सामान्यपणें आपण म्हणतों, त्याला दुःख झालं आहे म्हणून तो रडतो आहे. म्हणजे दुःख हें कारण आणखी रडणं हा जणूं त्याचा परिणाम. पण तसं नाहीं. रडणं म्हणजेच दुःख. त्या रडण्यापलीकडे दुःख वेगळं असं कांहीं नाहीं. याचा पुरावा असा, कीं जो मनुष्य हुंदके येऊं न देण्याचा आणखी डोळ्यांतनं अश्रू बाहेर पडूं न देण्याचा प्रयत्न करील त्याचं दुःख आपोआप कमी होतं, नाहींसंसुद्धां होतं; आणि उलट आपण जर जास्ती जास्तीच हुंदके द्यायला लागलों अन् आसवं ढाळूं लागलों तर दुःखाचा मनोविकारही अधिकाधिक भडकत जातो. मोठ्यांदा ओरडायचं नाहीं, हातपाय आपटायचे नाहींत, चेहरा लाल होऊं द्यायचा नाहीं, डोळेसुद्धां मोठमोठे करायचे नाहींत असा निश्चय करून मग रागावतां येतं का पहा !

या अमेरिकन पंडिताचा हा वितंडवाद खरा कीं खोटा हा प्रस्तुत प्रश्न नाहीं. माझ्या मुद्यापुरतं त्यांतलं सार घ्यायचं तें येवढंच कीं, मनुष्याच्या अंतःकरणांतले हर्षखेदादि धर्म तीव्र झाले कीं त्यांची ओळख त्याच्या चेहऱ्यावरून अन् वागण्यावरून ताबडतोब पटते. आणि यावरून आपल्याला असं खचित म्हणतां येईल, कीं माणसाच्या अंगचे स्वभावधर्म उत्कटावस्थेंतच ओळखतां यावेत असं थोडंच आहे ? साध्या अवस्थेंतही माणसाच्या बोलण्याचालण्यावरून, आवडीनिवडीवरून, शब्दांवरून ते ओळखणं कांहीं अशक्य नसावं.

निदान मी तरी तें अशक्य मानीत नाहीं; आणि यामुळं मी ज्यांच्याकडे जातों किंवा जे माझ्याकडे येतात, ज्यांची माझी थोडी फार ओळख होते अशा माणसांचे स्वभाव आणि त्यांच्या बोलण्याचालण्याच्या, बसण्याउठण्याच्या अन् हंसण्याच्या लकबी यांमधील मला दिसून आलेल्या परस्पर संबंधांवरून मी मनाशीं कांहीं आडाखे बसविलेले आहेत. आणि कुणीही नवं माणूस भेटलं कीं या आडाख्यांच्या अनुरोधानं मी त्याच्या स्वभावाचं कोडं उलगडण्याचा खेळ मनाशीं खेळत असतों.

माझ्याकडे बसायला आलेला माणूस चहा कसा पितो, धूम्रपान करणारा असेल तर सिगरेट कोणत्या दोन बोटांत कशी धरतो, सिगरेटच्या टोंकाची राख कितीदा व कशी झाडतो, बोलतांना हातवारे कसे करतो इत्यादि गोष्टी त्याला न कळत मी निरखून पहात असतों; व या गोष्टींवरून त्याच्या स्वभावाचा जो अंदाज मी बांधतों तो सहसा कधीं चुकत नाहीं. माझी दिवसानुदिवस अधिकाधिक खात्री होत चालली आहे, कीं मनुष्यस्वभाव हें एक ' उघडं गुपित ' आहे.

या खात्रीचा परिणाम मात्र असा होतो, कीं लोकांचे स्वभाव त्यांच्या बोलण्याचालण्यांतल्या अन वागण्यांतल्या लहानसहान गोष्टींवरून मला जर ओळखतां येतात तर माझाही स्वभाव लोकांना ओळखतां येत असेल असा विचार माझ्या मनांत कधीं कधीं येतो; अन् मग वाटतं आपण लोकांशीं बोलतां चालतांना जरा जपूनच वागलं पाहिजे. पण हा विचार फार वेळ मनांत रहात नाहीं. कारण त्याचं निराकरण करणाऱ्या दोन गोष्टी आहेत. त्यांतली पहिली ही, कीं स्वतःचा स्वभाव लपविण्याचा माझा स्वभाव नाहीं, आणि दुसरी ही, कीं बाकीचे लोक आपल्याइतके शहाणे आणि चतुर नाहींत ही जी विचित्र बुद्धि प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं थोड्या फार अंशानं असते ती माझ्याहि ठिकाणीं आहे.

म्हणून एकीकडे माझं अंतरंग वाचण्याचं कौशल्य लोकांच्या ठिकाणीं नाहीं अशा विश्वासानं, आणखी ज्याला वाचतां येईल त्याला तें कळेना का अशा बेफिकीरीनं मी माझे सारे व्यवहार करीत असतों !

★

# सुगंध : टिकाऊ आणि टिकाऊ-११

परवां कुठें वाचलं, कीं न्यूयॉर्कच्या एका ग्रंथप्रकाशकानं पुस्तकांचा खप वाढविण्यासाठीं एक नवीनच उपाय अंमलांत आणायचं ठरविलं आहे. पुस्तकांना कुठल्या तरी अत्तराचा सुगंध लावून तीं प्रकाशित करावयाचा त्याचा बेत आहे.

हें ऐकतांच माझ्या मनांत प्रथम आलं, कीं ही नाविन्यपूर्ण कल्पना आमच्या मराठी प्रकाशकांनींसुद्धां अंमलांत आणून पहाण्यासारखी आहे. मराठी वाचकवर्गात पुस्तकं विकत घेण्याची बुद्धि फारशी नाहीं अशी जी सध्यां यथार्थ ओरड आहे ती कदाचित् मग बऱ्याच अंशीं नाहींशी होईल. कारण, पुस्तकांतल्या ज्ञानाच्या परिमलाची जरी किंमत नसली तरी मलपृष्ठाच्या परिमलाची हौस पुष्कळ लोकांना वाटेल, अन् ते आवडीनं पुस्तक खरेदी करतील. स्त्रियांना जात्याच अत्तराचा षोक असतो म्हणतात, तेव्हां सुगंधी ग्रंथ निघूं लागल्यास स्त्रियांमध्यें वाचनाची गोडी झपाट्यानं वाढायचा बराच संभव आहे असं मानायलाही हरकत नाहीं. शिवाय, पुस्तकविक्रयांच्या दुकानाला सध्यां जी अगदींच सुतकी अवकळा नेहमीं आलेली दिसते, तीही या नव्या उपक्रमानं दूर व्हायला वेळ लागणार नाहीं. मला एखाद्या पुस्तकांच्या दुकानांत शिरायची वेळ आली कीं फारशा उल्हासानं कांहीं मी आंत पाऊल टाकीत नाहीं. कारण, एक तर हजारों पुस्तकांच्या राशीच्या राशी जरी दुकानांत दिसत असल्या तरी आपण मागावं तें पुस्तक बहुधा नसायचं हा अगदीं ठरीव नियम आहे. एखादे वेळीं दुकानदारानं मागितल्याबरोबर पुस्तक काढून दिलं कीं मला तर क्षणभर विस्मयाचा धक्काच बसतो. पुस्तकांच्या वांकड्या तिकड्या उतरंडी, पिंगट कागदांचे आणि सुतळीचे इतस्ततः विखुरलेले लहान मोठे तुकडे आणि अंधारांत एका टेबलावरच्या हिशेबांच्या वह्यांत तोंड घालून बसलेला, जाड लठ्ठ कांचांचा चष्मा घातलेला मालक हेंच पुस्तकांच्या दुकानाचं चित्र नेहमींच्या परिचयांतलं आहे. पुस्तकांच्या सुगंधी आवृत्ति निघूं लागल्या तर या चित्रांतला उदासपणा

थोडा तरी कमी नाहीं का होणार? आणि पुस्तकांच्या दुकानांत शिरायची उत्सुकता लोकांच्या ठिकाणीं थोडी तरी नाहीं का वाढणार?

तें कांहीं नाहीं, पुस्तकं सुगंधित करूनच प्रकाशित करावींत.

पण इथपर्यंत माझ्या विचारांची मालिका पोंचते न पोंचते तोंच पुस्तकं सुवासिक करून विकण्याच्या या योजनेचे दुष्परिणामही माझ्या डोळयांपुढें एकामागोमाग उभे राहूं लागले आणि त्या योजनेंतल्या अडचणीही माझ्या ध्यानांत येऊं लागल्या.

एक मोठी अडचण अशी, कीं प्रतिपाद्य विषयाचा गंधही नसतांना जे ग्रंथ लेखकांकडून लिहिले जातात त्यांना प्रकाशकानं तरी कुठला सुगंध आणून फासायचा? असला हा कृत्रिम गंध कितीही फासला तरी लेखकाच्या अज्ञानाचा त्यामुळं कितीसा लोप होणार? नव्हे, होत असला तरी तो होऊं देणं इष्ट आहे काय? कारण, मलपृष्ठाच्या सुगंधाच्या जोरावर पुस्तकं खपूं लागलीं अन् त्या सुगंधामुळं लेखकाच्या अज्ञानावर पांघरूण पडूं लागलं तर ती एक नवी आपत्तीच मानावी लागेल. कलेचा यत्किंचितही अभ्यास न करतां ललितकलेची मीमांसा करणारे, काव्यशक्तीचा लेशही अंगीं नसतां काव्याचे निर्झर वाहवणारे, कादंबरीलेखनास आवश्यक असणाऱ्या लालित्याचा स्पर्श लेखणीस नसतां कादंबऱ्या रचणारे–अशा मंडळींच्या जुलमानं आधींच आमचं मराठी साहित्य थोडं फार जर्जर झालेलं आहे. अशांत कागदाच्या अन् बांधणीच्या सुगंधाचा भरंवसा या मंडळींस मिळाला म्हणजे तीं आणखी कोणते अत्याचार करायला उद्युक्त होतील त्याचा काय नियम सांगावा?

शिवाय असं, कीं पुस्तकं सुवासित करून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम सुरू झाला तर त्याच्या पुढची सहजच प्राप्त होणारी पायरी अशी कीं त्या त्या लेखकाच्या स्वभावधर्माप्रमाणं व त्याच्या लेखनाच्या शैलीप्रमाणं त्याच्या पुस्तकांस एक विशिष्ट सुगंधच लावायचा. अमुक लेखकाचे ग्रंथ म्हटले कीं ते अमक्या सुगंधानं युक्त असायचेच असं करून टाकायचं. परंतु असं करायचं म्हटलं तरी किती तरी अडचणी उद्भवतील. हल्ली लेखकांचे खाजगी स्वभाव गुलदस्तांत राहतात म्हणून बरं आहे. त्या स्वभावाच्या तऱ्हेला अनुलक्षून

पुस्तकाला चोपडायच्या सुगंधाची तऱ्हा निवडून काढायची प्रकाशकांस पंचाईत पडेल. हट्टी, अहंमन्य, मत्सरी, चिरचिरे, स्तुतिलंपट अशा एकेक जातीच्या लेखकागणिक भिन्न भिन्न सूचक सुगंध प्रकाशकानं आणायचे कुठून ? बरं लेखकांचे स्वभावधर्म लक्षांत न घेतां केवळ त्यांच्या लेखनशैलीस साजेसा त्यांच्या पुस्तकांचा एक विशिष्ट सुगंध ठरवून टाकायचा म्हटला तरी काम कांहीं सोपं नाहीं ! खाडिलकरांच्या झणझणीत नाटकांना काय खस लावायचा ? केळकरांच्या चुरचुरीत, ताज्यातवान्या भाषाशैलीचा गौरव काय गुलाब चोपडून करायचा ? वामनरावजींच्या कादंबऱ्यांना केवडा चालेल काय ? आणि वाळा, हीना, चंदन, मधुमालती, सुरंगी इत्यादींची वाटणी कशी करायची ? आणि हा प्रश्न जर फार बिकट असेल तर सुगंधी पुस्तकांची कल्पना टाकून दिलेली काय वाईट ?

आणखी असं कीं आधींच ठराविक ठशाचे अभिप्राय ठोकून द्यायला सवकलेले पुस्तकपरीक्षक सुगंधी ग्रंथांची कल्पना प्रचारांत आली तर अधिकच आळशी बनतील, आणि पुस्तक न वाचतां त्याच्या बाह्यांगावर चार मोघम शब्द लिहिण्यास त्यांना अधिकच वाव मिळेल. एखाद्या गचाळ पुस्तकाबद्दल ते लिहितील, " पुस्तकास लावलेला सुगंध अगदी भारीपैकीं आहे व प्रत्येक रसिक स्त्रीपुरुषानें हें पुस्तक आपल्या शयनमंदिरांत अवश्य ठेवावें." आणि एखाद्या उत्कृष्ठ ग्रंथावर ते कदाचित् खुशाल असा अभिप्राय देतील कीं, "ग्रंथाला लावलेला वास अगदींच सामान्य प्रतीचा आहे, व त्यामुळें सामान्य वाचकांस ग्रंथाची किंमत जरा भारी वाटण्याचा संभव आहे. ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास अगदीं निवडक अत्तर खरेदी करून पुस्तक सुगंधित करावें अशी आमची आग्रहाची सूचना आहे."

अशीच आणखी एक आपत्ति ओढवण्याचा संभव आहे. पुस्तक विकत घेण्याऐवजीं लोकांकडून मागून आणून तें परत करायला विसरण्याची जी कला आमच्या वाचकवर्गाच्या ठिकाणीं दिसून येते ती ग्रंथ सुगंधी झाले कीं ताबडतोब वाढत जाईल. रामरावांकडून मागून आणलेलं पुस्तक शामराव नुसतं वाचून थांबणार नाहींत तर आपल्या कपड्याच्या पेटींत ठेवून देऊन मोकळे होतील. घटकाभर मनोरंजन करून घेऊन कपड्यांच्या परीटघड्या कायमच्या सुगंधी

करायचा दुहेरी हेतू जर असा साधूं लागले तर नेलेलीं पुस्तकं परत करायची मूर्खपणाची आठवण सहसा कुणाला व्हायचीच नाहीं !

सारांश, दिखाऊ वासानं ग्रंथ सुगंधित करण्याची कल्पना कितीही आकर्षक वाटली तरी विचाराअंतीं घातुकच ठरेल. ग्रंथाच्या बाह्यांगाच्या बाबतींत कृपणाचें व्रत आचरणाऱ्या आमच्या मराठी प्रकाशकांच्या अगदीं विरुद्ध टोंकाला असलेल्या उधळ्या अमेरिकन प्रकाशकांची ही एक नवीन लहर आहे झालं ! ग्रंथाचं बाह्यांग सुबक अन् टिकाऊ असावं आणि कोणतंही पुस्तक दिसायला मनोहर आणि हातांत वागवायला सोयीस्कर असावं येवढा जरी बोध अमेरिकन लोकांच्या या अभिनव कल्पनेवरून आमच्या मराठी प्रकाशकांनीं घेतला तरी पुष्कळ झालं ! आणि प्रकाशकांनीं अत्तर चोपडून पुस्तकं सुगंधित करणं जितकं हास्यास्पद तितकंच लिहिणाऱ्याच्या हृदयाला कळकळीचा, सहानुभूतीचा आणि अभ्यासाचा गंधही नसतां पुस्तकं लिहिणं हास्यास्पदच नव्हे तर पातकासमान होय, हें लेखकांनीं सतत आपल्या मनांत वागवलं तरी पुष्कळ झालं !

ग्रंथाच्या पानागणिक लेखकाच्या लालित्याचा, विद्वत्तेचा अन् श्रद्धेचा परिमल येत असला म्हणजे त्या ग्रंथाला कृत्रिम सुगंध न लावतांही वाचकवृंद भ्रमासारखे त्यावर लुब्ध होतात. सतत अभ्यासानं व दीर्घ परिश्रमानं हा टिकाऊ सुगंध आपल्या लेखणींत येईल असा कटाक्ष लेखकानं ठेवला पाहिजे. हा परिमल इतका दिव्य आहे कीं हजारों वर्षें झालीं तरी तो उडून जात नाहीं किंवा कमीही होत नाहीं. कालिदासाचं शांकुतल केव्हांही उघडलं तरी वाचणाऱ्याच्या अंतरंगांत एक अवर्णनीय सुगंध दरवळतो याचं कारण हेंच ! असल्या सुगंधानं आपलं लेखन परिपूर्ण असावं याहून अधिक उच्च महत्त्वाकांक्षा लेखकाला धरतां येणार नाहीं.

★

पत्रं लिहिणारांच्या किती नाना तऱ्हा असतात पहा !

कुणाचीं साध्या काळया शाईत लिहिलेलीं, कुणाचीं गडद निळया शाईत लिहिलेलीं, कुणाचीं चमकदार हिरव्या, तर कुणाचीं मोरपंखी शाईतलीं. कुणी हौसेनं मोठे सुबक कागद वापरून लिहितो, तर कुणी हाताला येईल त्या साध्या चतकोर चिटोऱ्यावर लिहिलेलं असतं. कागदाच्या जातीवरून अन् किंमतीवरून लिहिणाऱ्याच्या प्रेमाची किंमत करावी म्हटलं तर तशीही सोय नाहीं. माझ्या ओळखीचे एक गृहस्थ आहेत, त्यांजकडून मला येणाऱ्या पत्रांत मजकूर बहुधा जुजबी कामासंबंधींच असतो, अन् आठ दहा ओळींचाच असतो; पण त्यांनीं वापरलेला कागद इतका उंची असतो कीं मला वाटतं टपाल-हशिलाइतकीच त्यांच्या एकेका चतकोर कागदाला अन् पाकिटाला किंमत पडत असली पाहिजे. उलट, मला गाढ स्नेहानं भरलेलीं पत्रं पाठवणारी एक व्यक्ति अशी आहे, कीं तिचीं पत्रं साध्या बाजारी वहींतून फाडलेल्या चतकोर कागदावर लिहिलेलीं, आणि टपाल खात्याच्या साध्या पांढऱ्या पाकिटांत घालून धाडलेलीं असतात. मी या व्यक्तीला पुष्कळदां लिहिलं कीं, 'तुझीं पत्रं मला फार प्रिय वाटत असल्यामुळं तीं मीं जतन करून ठेवीत असतों. तेव्हां जरा चांगला कागद वापरीत जा.' पण माझ्या या स्पष्ट सांगण्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर वहींतून घाईनं फाडलेल्या चतकोरावर लिहिलेलं पत्र आलं कीं माणसाला काय वाटतं याची त्या व्यक्तीला कल्पना यावी म्हणून तसलं एक पत्र मीं तिला पाठविलं. पण त्या पत्राचा तिला थोडा तरी विषाद वाटेल हा माझा हिशोब सपशेल चुकला. तिला त्याचं कांहींच वाटलं नाहीं, अन् तिच्या पत्रांची तऱ्हा मूळपासून आहे तीच अजून आहे. स्वभावाला औषध नाहीं म्हणतात, त्याप्रमाणेंच मला वाटतं पत्र लिहिण्याच्या तऱ्हेलाही औषध नाहीं !

माझे एक स्नेही आहेत. त्यांचीं पत्रं मला क्वचितच येतात म्हणून बरं; नाहीं तर माझी कांहीं धडगत नव्हती. कारण तीं नेहमीं मोडींत लिहिलेलीं

असतात. मीं लहानपणीं मोडी कित्ते गिरविले नाहींत असं नाहीं; इतकंच नव्हे तर आमच्या लहानपणीं मोडी वाचनाचा एक तास असे अन त्या तासासाठीं आमचे मास्तर मामलेदार कचेरींतल्या जुन्या कैफीयती मागून आणीत असत. पण गुरूजींच्या या विशेष मेहनतीमुळेंच कीं काय कुणास ठाऊक मोडी लिपीची जी मी त्या वेळीं एकदां धास्ती घेतली ती अजून कायम आहे. एक वेळ मी कुराण वाचायला तयार होईन, पण मोडी पत्र ! अरे बापरे ! मी माझ्या उपरोक्त स्नेह्यांना एकदां स्पष्ट कळवलं कीं, 'महाराज तुमचीं पत्रं माझ्याकडून वाचलीं जावींत अशी तुमची इच्छा असेल तर कृपा करून मोडींत लिहायचं बंद करा !' या माझ्या पत्राला त्यांनीं दीड हात लांब उत्तर लिहिलं. अन तें मोडींत ! काय बिशाद मी पुन्हां त्यांच्या पत्र लिहिण्याच्या तऱ्हेविरूद्ध ब्र काढीन !

माझ्याशीं बराच पत्रव्यवहार करणारे एक गृहस्थ असे आहेत की त्यांनीं पत्र लिहिण्याच्या प्रारंभीं व्यवस्थित तीन बोटांचा रुंद समास सोडलेला असतो, पण अखेर मजकूर मावेनासा होऊन कोरा सोडलेला समास इतकंच नाहीं तर मायन्याच्या वरची आणि सहीच्या खालची अरुंद जागासुद्धां मजकुरानं गिचमिड भरून जायची हें ठरलेलं. मी त्यांना एकदां लिहिलं, कीं तुमच्या प्रत्येक पत्राभोंवतीं ही रांगोळी कशाला काढतां ? पण त्यांची तऱ्हा कांहीं बदलत नाहीं. त्यांनीं चार पानांचं पत्र लिहिलेलं असलं तरी अखेर थिएटरांतल्या सगळया जागा भरल्यावर गयावया करणाऱ्या फुकटयांना मॅनेजर जागा दिसेल तिथें उभा करतो त्याप्रमाणें त्यांच्या पत्राच्या भोंवतालीं मजकूर गर्दी करून उभा राहिलेला असायचाच ! माणसाच्या पत्र लिहिण्याच्या तऱ्हेला औषध नाहीं हेंच खरं !

कांही माणसांच्या पत्रांत सहीच्या खालीं 'ताजा कलम' हटकून असायचाच ! पत्राच्या लांबीरुंदीशीं त्यांच्या 'ताज्या कलमा' चा कांहीं संबंध नसतो. बोटभर चिठी धाडायची झाली तरी तिला 'ताज्या कलमा' ची पुस्ती जोडल्याशिवाय त्यांना चैन पडत नाहीं. अशा स्वभावाच्या माझ्या एका मित्रानं मला एकदां लिहिलेलं पत्र नमुन्यादाखल पुढें देतोः-

## ताजा कलम

" प्रिय आप्पासाहेब,

येत्या सोमवारीं रात्रीं आमच्या घरीं ××× खांसाहेबांचं गाणं होणार आहे. तरी अवश्य यावं.

आपला,

× × × ×

ताजा कलम—××× खांसाहेबांचं गाणं फार दिवसांत ऐकलं नाहीं असं तुम्ही मागं एकदां माझ्याजवळ म्हणाला होतां. तेव्हां तुम्ही खचित् याल अशी आशा मी धरून आहे. "

आतां या ताज्या कलमांत कांहीं अर्थ आहे का ? त्यांत कांहीं निराळी गोष्ट सांगितलेली आहे ? जें वाक्य ताज्या कलमांत लिहिलं तें मुख्य मजकुरांत लिहून मग सही करावयाला या माझ्या मित्राला कोणता प्रत्यवाय होता ? पण त्याची स्वभावसिद्ध खोड लपायची कशी ?

माझ्या असल्याच दुसऱ्या एका मित्राच्या पत्रांत तर एखादे वेळीं एकच नव्हे तर एकामागोमाग लिहिलेले तीन तीन, चार चार ' ताजे कलम ' असतात. एकदां तर या गृहस्थानं कमाल केली. पाकीट बंद करून तिकीट लावल्यावर मग त्याला एक ' ताजा कलम ' सुचला आणि तो खुशाल पाकिटावर लिहायला त्यानं कमी केलं नाहीं. ' ताजा कलम ' लिहिल्याशिवाय न राहवणाऱ्या या माणसांची मनोरचना मला मोठी मनोरंजक वाटते. मी त्या मनोरचनेचा जों जों विचार करतों तों तों मला अधिकाधिक असं वाटूं लागतं कीं त्यांची विचारक्रियाच थोडीशी अव्यवस्थित असली पाहिजे. आपल्या पत्रांत अमुक इतक्या गोष्टी लिहायच्या आहेत हें पत्र लिहायला बसण्यापूर्वीं त्यांना ठरवतांच येत नसलं पाहिजे. पत्राच्या खालीं सही केल्यावर मग त्यांना सुचतं, कीं अरेच्या, अमकी गोष्ट लिहायची राहिली. आणि ती लिहून झाली कीं आणखी एक विसरलेली गोष्ट त्यांना आठवते. मायन्यापासून सहीपर्यंतच्या अवकाशांत व्यवस्थित अन् आटोपशीरपणें सुसंबद्ध पत्र लिहिणाराबद्दल मला जसा आदर

वाटतो, तद्वतच पत्राच्या अखेर एक अथवा अधिक ' ताजे कलम ' लिहिणाऱ्या माणसाच्या स्वभावांत अव्यवस्थितपणा असला पाहिजे असा माझा ग्रह होतो. माझ्या ओळखीच्या एका गृहस्थांना प्रवासाची तयारी कधीं धडपणें करतां येत नाहीं. बॅग बंद केल्यावर त्यांना आठवतं कीं आपलं हजामतीचं सामान बरोबर घ्यायचं राहिलं. मग ते बॅग पुन्हां उघडतात आणि तें सामान घालून बंद करतात. पण नंतर पुन्हां कांहीं वेळानं महत्त्वाचे कागद म्हणा, एखादं पुस्तक म्हणा किंवा दुसरी कांहीं वस्तु म्हणा बॅगेंत घालायची राहून गेल्याचं त्यांच्या लक्षांत येतं. आणि त्यामुळं त्यांच्या बॅगेची उघडझांक अखेरपर्यंत चालू राहते. पत्रांत ' ताजे कलम ' लिहिणारे लोक या गृहस्थांच्या सारखेच नाहींत काय ? मला स्वभावतः टापटीप अतिशय प्रिय असल्यामुळं अव्यवस्थित आणि विसराळू मनोवृत्ति दर्शविणारे हे ' ताजे कलम ' मला कांहीं आवडत नाहींत !

याचा अर्थ कोणत्याही पत्रांत ' ताजा कलम ' दिसल्याबरोबर मला त्या पत्राविषयीं अप्रियता वाटूं लागते असा मात्र नाहीं हं. छे छे ! उलट कांहीं पत्रं तर त्यांतल्या ' ताज्या कलमा ' मुळं मला विशेष आवडतात. कारण, त्यांतल्या ताज्या कलमांना विसराळूपणाचा अगर अव्यवस्थितपणाचा दर्प येत नसून काव्यमय हृदयाचा सुगंध येत असतो. उदाहरणार्थ पुढील पत्र पहाः—

" प्रिय आप्पासाहेब

या वेळेस तुमच्या पत्राची तुम्ही मला नेहमीपेक्षां अधिक वाट पहायला लावलीत. तुम्ही किती कामांत होतां हें तुमच्या पत्रावरून मला आतां समजलं म्हणून मी आतां तुमच्यावर रागावत नाहीं. तुम्ही म्हणतां तीं पुस्तकं वाचनमंदिरांतून आणून मी जरूर वाचीन. वाचनाच्या हौसेंत व्यत्यय आला कीं पुष्कळदां वाटतं मोठ्या शहरांत राहिलेलं अधिक बरं. सुशिक्षितांनीं खेड्यापाड्यांत जाऊन राहिलं पाहिजे असं आमचे पुढारी सांगतात त्याबद्दल विचार करतांना माझ्या मनांत पुष्कळदां येतं, कीं ज्या गोष्टींवांचून सुशिक्षित माणसाला जीवित अगदीं कंटाळवाणं वाटेल त्यांचा आमच्या देशांतल्या खेड्यापाड्यांत किती

तीव्र अभाव आहे याचा हे पुढारी विचार करीत नसावेत. विलायतेंतल्या खेडयापाडयांत लायब्ररी, रेडिओ, खेळण्याचे क्लब इत्यादि साधनांची विपुलता असते. तिथें सुशिक्षित लोक जाऊन राहिले तर पाण्याबाहेर काढलेल्या मासळीसारखी त्यांची अवस्था व्हायचा कांहीं संभव नाहीं. तेव्हां त्यांचा दाखला देण्यांत काय अर्थ आहे ?

याचा अर्थ मला इथें राहण्याचा कंटाळा आला आहे असा मात्र करूं नका. शक्य तितकं आनंदित राहून मी इथें दिवस काढीत आहे. शाळेंतलं काम, घरांतलं काम, पुढच्या परीक्षेचा अभ्यास आणि वाचणं-लिहिणं यांत माझा दिवस कांहीं जड पावलांनीं जात नाहीं. माझी प्रकृतीही छान आहे.

हें पत्र तुमच्या प्रवासांतल्या पत्त्यावर मिळावं म्हणून घाईनं पुरं करीत आहे. तुम्ही घरीं याल तेव्हां माझं मोठं पत्र तुमच्या टेबलावर खास हजर असेल. तेव्हां आतांपुरता निरोप घेऊं काय ?

×××

ता० क०—आतां रात्रीचे साडेनऊ वाजले आहेत. वद्य तृतीयेचा चंद्र क्षितिजावर हलके हलके येतांना मला माझ्या खिडकींतून दिसत आहे. आमच्या बागेंतलीं सायलीचीं फुलं आपला मृदु सुगंध वाऱ्याच्या लहरीबरोबर जिकडे तिकडे पसरवीत आहेत. तुम्हांला आठवतं का अशाच एका रात्रीं आमच्या बागेंतल्या हौदाच्या कठ्यावर आपण किती तरी वेळ बोलत बसलों होतों ?

×××

आणखी ता० क०—तुम्ही शिकवलेलं गाणं आतां दिलरुब्यावर चांगलं वाजवायला यायला लागलं आहे. पुढच्या भेटींत मी वाजवून दाखवीन. पण तुम्हांला वाजवून दाखवायचं म्हटलं कीं माझा फार गोंधळ उडतो.”

×××

हे ताजे कलम किती ताजे आहेत ! लिहिणाऱ्या व्यक्तीच्या अंतःकरणाच्या माधुर्याची आणि लाघवीपणाची ते किती सुंदर साक्ष देतात ! पत्रांतल्या मुख्य मजकुरापेक्षांही असल्या ताज्या कलमांतच अधिक अर्थ भरलेला असतो. जें मजकुरांत प्रगट झालेलं नसतं तें या ताज्या कलमांत नाजुकपणानं उघड केलेलं दिसतं. या ताज्या कलमांतला अभिप्राय असा स्पष्ट असतो कीं, पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीला माझा निरोप घेणं कष्टदायक होत असून कांहीं तरी मिषानं ती माझ्याशीं आणखी आणखी बोलत आहे. एकमेकांचा निरोप घेणाऱ्या स्नेहबद्ध व्यक्तींचं रेंगाळणं अंतःकरणाच्या ज्या काव्यमय जडतेनं चालतं ती जडता त्यांत असते. विरहकाल सन्निध आला असतांना अखेरचं चुंबन म्हणतां म्हणतां ज्या अतृप्तीनं प्रेमिक पुनःपुन्हां एकमेकांजवळ तोंड नेतात ती अतृप्ति या ताज्या कलमांत असते.

मला जर कोणी विचारलं, कीं जगांतल्या संपत्तींत सर्वांत श्रेष्ठ संपत्ति कोणती तर अशा मधुर ताज्या कलमांचीं कधींच शिळीं न होणारीं पत्रं असं मी ताबडतोब उत्तर देईन.

★

स्थूल वाचनासाठीं

● निवडक चिमणराव

लेखक - प्रो. चिं. वि. जोशी

संपादक - भि. अ. परब

पृष्ठें - १२५; किंमत १। रु.